# ऋतु फुलांची

रमण रणदिवे



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६९२

REFBK-0026164
REFBK-0026164

## 'श्रीविद्या'ने प्रसिद्ध केलेले काव्य संग्रह

**फ. मुं. शिंदे**
प्रार्थना
जुलुस

**बापूराव जगताप**
मॉस्कोतील कविता

**मनीषा पिंपळखरे**
मन मातीचे

**दिलीप वि. चित्रे**
हिमगंध

**वा. ज्यो. देशपांडे**
स्वस्तिका.

**अश्विनी घोंगडे**
स्त्री सूक्त

**कविता जपे**
वाटेवरले गाणे

**अंजली कीर्तने**
हिरवी गाणी

**हेमकिरण द. पत्की**
पाऊस फुले

**यशवंत मनोहर**
मूर्तिभंजन

**रा. सो. सराफ**
पुन्हा यावे ज्ञानेश्वरा

**श्रीविद्या प्रकाशन**

# ऋतू फुलांचा

( कवितासंग्रह )

रमण रणदिवे

प्रस्तावना
शांता ज. शेळके

REFBK-0026164
REFBK-0026164

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

© रमण रणदिवे

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
२३ एप्रिल १९९०

मुखपृष्ठ : मुकुंद तळवलकर

मूल्य : तीस रुपये फक्त

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय,
४६१/४ 'शिव-पार्वती'
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

२६९२
काव्य २६९६४
२०/५/९०

# ऋणनिर्देश

| | |
|---|---|
| प्रल्हाद शां. रणदिवे | अरुण खोरे |
| गजाननराव वाटवे | जयंत पेंढारकर |
| कविवर्य सुरेश भट | श्रीनिवास काकडे |
| शांता शेळके | सुनील आढाव |
| हृदयनाथ मंगेशकर | अनिल दहिवाडकर |
| यशवंत देव | शाम पानगंटी |
| मधुकाका कुलकर्णी | विल्सन मॅसी |

इतर माझे अनेक स्नेही.

# ऋतुगंधाची चाहूल

चार वर्षांपूर्वी मी जेव्हा पुण्यात कायमची राहण्यासाठी आले तेव्हा जुन्या मित्रमैत्रिणींच्या जोडीने इथल्या काही नव्या मंडळींच्याही गाठीभेटी होऊ लागल्या. पुण्यात तरुण कविकवयित्रींची संख्या लक्षणीय आहे हे तेव्हा मला जाणवले. त्यातल्या काहींशी माझा परिचय झाला तर मोजक्या काही व्यक्तींबरोबर स्नेह जडला. अशा नव्याने लाभलेल्या कवि मित्रमैत्रिणींमधले रमण रणदिवे हे एक कवी आहेत. प्रारंभी कविसंमेलनाच्या निमित्ताने त्यांच्याशी झालेली ओळख लौकरच औपचारिकपणाचा उंबरठा ओलांडून मैत्रीच्या घरात प्रविष्ट झाली आणि आता तर रमणबरोबर त्याचे सारे कुटुंबच अनौपचारिक स्नेहाच्या नात्याने मला जवळचे वाटू लागले आहे. शांत, शालीन, काहीसा अबोल स्वभाव, कवितेवरचे उत्कट प्रेम, वाङ्मयीन घडामोडींबद्दलचा कुतूहलपूर्ण जिव्हाळा हे रमण रणदिवे यांच्या व्यक्तित्वाचे ठळक विशेष आहेत. ते स्वतः कविता तर करतातच, पण संगीताची जाणकारी असल्यामुळे कवितेच्या गेय अंगाशीही ते चांगले परिचित आहेत. 'ऋतू फुलांचा' या सुंदर नावाने त्यांचा पहिलावहिला संग्रह आज प्रकाशित होत आहे. त्याला वडिलकीच्या अधिकाराने नव्हे तर कवितेवरील प्रेमामधल्या समानधर्मित्वाच्या नात्याने मी ही प्रस्तावना लिहीत आहे.

हल्ली कवितासंग्रहांची संख्या खूपच वाढली आहे. दूरदर्शन, दूरचित्रवाणी, कविसंमेलने इत्यादी प्रसिद्धिमाध्यमांची विपुलता, साहित्य संस्कृती मंडळातर्फे दिली जाणारी अनुदाने, स्वतः कवींना आपणच पुस्तक प्रसिद्ध करावे अशी वाटणारी हौस आणि एकूण कवितालेखनाबद्दलचा सार्वत्रिक वाढता उत्साह यामुळे इतर साहित्यप्रकारांच्या तुलनेने कविता ही ग्रंथरूपाने अधिक मोठ्या प्रमाणावर वाचकांसमोर येत आहे. या कवितासंग्रहांची संख्या आणि त्यातले काव्यगुण यांचे प्रमाण बहुधा व्यस्त असते. त्यामुळे संग्रह बरेच हाती आले तरी ते वाचून बघताना निराशाच पदरी पडते. मग एखादा खरोखरच चांगला संग्रहही केवळ आपल्या अनवधानाने वा उपेक्षावृत्तीने दुर्लक्षिला जाण्याचा संभव असतो. अशा परिस्थितीत 'ऋतू फुलांचा' या कवितासंग्रहाचे हस्तलिखित माझ्या हाती पडले. सुरुवातीला रमण रणदिवे या कविमित्राच्या कविता म्हणून

मी त्या कुतूहलाने वाचू लागले. पण मग स्वतंत्रतः कवितांनीच माझे मन वेधून घेतले. 'ऋतू फुलांचा' वाचल्यावर माझ्याप्रमाणेच वाचकांनाही एक चांगला कवितासंग्रह वाचल्याचे समाधान लाभेल यात मला शंका वाटत नाही.

रमण रणदिवे यांच्या कवितांचे पहिले वैशिष्ट्य मला जाणवले ते असे की या सर्व कविता सहज, सुबोध, आकलनाला कुठेही अडथळा न आणणाऱ्या अशा आहेत. या संग्रहातली प्रायः एकही कविता संदिग्ध, धूसर किंवा मनावर कसलाच ठसा न उमटवणारी अशी नाही. अर्थात सुबोधता व दुर्बोधता हे कवितेचे स्वतंत्रपणे ध्यानात घ्यावेत असे गुण किंवा घटक नसतात याची मला पूर्ण जाणीव आहे. दुर्बोधतेवर माझा आरोप नाही. अनुभवांच्या व्यामिश्रतेमुळे त्यांच्या आविष्कारात येणारी दुर्बोधता ही अपरिहार्य असते. केशवसुत, बी, गोविंदाग्रज यांच्यासारख्या जुन्या कवींपासून तो मर्ढेकर, विंदा करंदीकर, आरती प्रभू, ग्रेस अशा अलीकडच्या काळातल्या कवींपर्यंत अनेक श्रेष्ठ कवींच्या काव्यात तिचा आढळ होतो. दुर्बोधता जेव्हा कवितेचा प्राणभूत घटक बनून येते, तिचा चैतन्यांश असते तेव्हा तिला कुणी आक्षेप घेत नाही. तसा तो घेऊही नये. पण आजची एक टूम किंवा चूष म्हणून कवी जेव्हा तिचा मुद्दाम अवलंब करतात, चित्रविचित्र प्रतिमांच्या जटिल अरण्यात आशय गुदमरवून किंवा हरवून टाकतात तेव्हा मात्र ती दुर्बोधता आक्षेपार्हच नव्हे तर निषेधार्हही ठरते कवितेशी जवळीक साधू बघणाऱ्या प्रांजल रसिकांचा आक्षेप असतो तो या फॅशनेबल दुर्बोधतेला. रमण रणदिवे हे आपली कविता अशी जाणूनबुजून दुर्बोध करण्याच्या किंवा अनोख्या प्रतिमांच्या आतषबाजीने वाचकांचे डोळे दिपवून टाकण्याच्या मोहाला बळी पडलेले नाहीत हे मला आवर्जून सांगावेसे वाटते. त्यांची कविता उगाच चलाख, चटपटीत, वाचकाला चकवे घालणारी नाही, किंवा ती कसला आवही आणत नाही, हे तिचे अंगभूत साधेपण मला फार विलोभनीय वाटते.

'ऋतू फुलांचा' या संग्रहातल्या बहुसंख्य कविता 'गझल'च्या रचनाबंधात लिहिलेल्या आहेत. गझलरचनेबद्दल आजच्या कवींना वाटणारी ओढ रमण यांच्या ठिकाणीही आहे. गझलला अलीकडे एकदम खूप लोकप्रियता लाभली आहे. हिंदी चित्रपटांच्या अनुषंगाने किंवा मेहदी हसन, गुलामअली यांच्यासारख्या अभिजात गझलगायकांच्या जाहीर गझलगायनामुळे हल्ली हा काव्यप्रकार सातत्याने किंवा वैपुल्याने कानावर पडत आहे. सुरेश भट या श्रेष्ठ कवीने मराठीत

किती उत्तम गझलरचना करता येते, आणि गझलचे जाहीर कार्यक्रम किती प्रभावी, भावोत्कट होऊ शकतात हे आपल्या स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले आहे. गझल जाहीररीत्या सादर करता येतात हे त्याच्या लोकप्रियतेचे एक ठळक कारण असावे. लेखनातलीच नव्हे तर वाचनातलीही बेहोषी, बुद्धिचातुर्य अनुभवांच्या विरोधपूर्ण मांडणीतून साधली जाणारी कल्पनाचमत्कृती, ठाम आणि निर्णायक विधानांमुळे आविष्कारात येणारा ठोसपणा हे गझलचे काही ठळक विशेष आहेत. या विशेषांमुळे गझलला दादही भरपूर आणि तात्काळ मिळते. एखाद्या नाजूक, तरल, संयत आणि सूचक कवितेपेक्षा आवाहक आणि आक्रमक गझल सर्वसामान्य अभिरुचीच्या श्रोत्याला अधिक मानवतो हे तर आपण नेहमी बघतच आलो आहोत. अशा परिस्थितीत श्रोत्यांकडून चटकन दाद वसूल करणारा आणि लोकप्रियतेचे भरगच्च माप कवीच्या पदरात टाकणारा हा रचनाप्रकार तरुण कवींना एकदम आकर्षक आणि अनुकरणीय वाटावा यात काही आश्चर्य नाही. रमण रणदिवे यांनीही खूप मोठ्या प्रमाणात गझलरचना केली आहे. त्यांच्या गझलांचा प्रथमच नजरेत भरणारा ठळक विशेष हा की, त्यात गझलचे अनेक रचनाबंध कवीने वापरले आहेत, आणि ही सर्व रचना बव्हंशी निर्दोष आहे. आजच्या अनेक कवींना गझलरचना ही फार सोपी वाटते, पण ती तशी नसते. वृत्तरचनेइतकाच गझलमध्येही लघुगुरू अक्षरांचा क्रम कसोशीने सांभाळावा लागतो आणि मात्रांचा हिशेब तर गणिती पद्धतीने अगदी चोख राहील याची काळजी घ्यावी लागते. रमणच्या गझलरचनेत हा निर्दोषपणा आणि ही सफाई फार चांगल्या रीतीने प्रत्ययास येते. क्वचित जिथे दोन गुरू अक्षरे असायला हवीत तिथे एक गुरू, दोन लघू अशा अक्षरांची योजना करून मात्रांचा हिशेब ते बिनचूक राखतात. पण अशी रचना काही प्रमाणात तरी कर्णकटू होते व जाणत्या रसिकाला ती खटकल्याशिवाय राहात नाही. सुदैवाने रमण यांच्या गझलात अशा जागा फार थोड्या आहेत. पण गझलमध्ये 'यती' म्हणजे विशिष्ट जागी थांबण्याची ठिकाणेही असतात. तिथे शब्द जर संपला नाही तर तो विचित्रपणे तुटतो आणि मग यतिभंग होऊन वाचकाचा विरस होतो. समाधानाची गोष्ट अशी की, हे यतिभंग रमणच्या गझलात क्वचितच येतात.

गझलांच्या रचनाबंधाबरोबर त्यांच्या आशयाचाही विचार करायला हवा. गझल म्हणजे केवळ प्रेमगीत नसते. त्यातून सामाजिक आशयही प्रकट करता

येतो, असा गझलच्या प्रणेत्यांचा दावा आहे. कोणत्याच काव्यप्रकाराला कोणताही आशय वर्ज्य असण्याचे काही कारण नाही. त्या दृष्टीने गझलांतून सामाजिक जाणीव समर्थपणे व्यक्त झाल्यास ती हवीच आहे. प्रारंभीच्या काळात समृद्ध गझलरचना करणाऱ्या माधव जूलियनांनी 'गज्जलांजली'त धुंद प्रणयगीता-बरोबर सामाजिक चिंतनपर गझलही भरपूर लिहिले आहेत. पण आजच्या गझलांतून जे सामाजिक चिंतन आढळते ते फार एकसुरी, सांकेतिक आणि जीवनातल्या बऱ्यावाइटाची सरधोपट विभागणी करणारे वाटते. रमण रणदिवे यांच्या सामाजिक आशयपर गझलांतही ही सांकेतिकता सोपे सामाजिक वर्गीकरण आढळते. उदाहरणार्थ पुढील ओळी बघ्याव्यात–

नोंदवू फिर्याद कोठे सत्यतेची ?
नेहमी खोटारड्यांची जीत आहे (रीत)
खऱ्याची कोणती व्याख्या कळेना सभ्य लोकांना
मघाशी चोर जो होता अता सावापरी झाला (भेद)
सन्मान इथे का होतो पापाचा मला कळेना
का न्याय तुझा रे देवा पुण्याच्या भाळी नाही (टवाळी)
वस्तीत दुःखितांच्या काळोख धूर्त आला
आजन्म सोबतीचा त्याने करार केला (सौदा)

या कवितापंक्तींतून आजच्या समाजाचे जे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते ते एकजात खोटे, कपटी, क्रूर, भ्रष्टाचारी, पापी असे आहे, आणि ही जाणीव व्यक्त करणाऱ्या प्रतिमाही सांकेतिक आहेत. सूर्य आणि काळोख, सत्य आणि असत्य, न्याय आणि अन्याय या जोड्या इथे वारंवार येतात. समाजाचे हे दर्शन प्रथमदर्शनी मनाला हादरवून सोडते यात शंका नाही. पण प्रश्न असा आहे की, हे चित्र संपूर्णतः खरे आहे का ? जीवनातल्या बऱ्यावाइटाची विभागणी इतकी साधी, सोपी असते का ? वस्तुस्थिती अशी आहे की, हे वास्तव घृणास्पद असले तरी त्यावर शेरे मारणारे कवी, कलावंत, लेखक हेही अपरिहार्यपणे त्याचाच एक भाग असतात. आपण सारेच या परिस्थितीला या ना त्या रूपाने हातभार लावत असतो. तेव्हा कवींनी आपण याहून वेगळे आहोत अशा आत्मतृप्त भावनेने जगावर टीका करण्यात फारसा अर्थ नसतो. हा आक्षेप मी फक्त रमणच्या कवितेवर घेत आहे

असे नाही, कारण रमणपेक्षा फार मोठ्या नामवंत कवींनाही आपल्या गझलांमधून आजच्या सामाजिक अवनतीचा, भ्रष्टाचाराचा असाच सोपा आणि सोयिस्कर अन्वयार्थ लावण्याचा मोह आवरलेला नाही. रमण यांच्या सामाजिक आशयपर गझलांत इतर मान्यवर गझललेखकांच्या कल्पनांचे, शब्दांचेही स्पष्ट, अस्पष्ट पडसाद उमटलेले दिसतात मान्यवरांचे असे पडसाद नव्या कवितांत आढळणे स्वाभाविक असले तरी समर्थनीय खास नाही. जी गोष्ट कल्पनांची तीच गोष्ट विशिष्ट शब्दांची. आजच्या गझललेखकांनी ( मूळच्या उर्दू गझलरचनेशी आपले नाते राखण्यासाठीच की काय ) काही उर्दू पर्शियन शब्दांचा आपल्या गझलांत सर्रास वापर केलेला दिसतो. चर्चा, मंजूर, नूर, लफंगा, फिर्याद, शिताफी, कायदा, मोसम हे व असेच अनेक शब्द इतक्या वेळा आजचे गझललेखक वापरतात की त्या शब्दांनी मनात आता कसलाही तरंग उमटत नाही. गझलची शैली अशी उर्दू फारसीमिश्रित असल्याखेरीज गझलला गझलपण येत नाही अशी मराठी गझलकारांची कल्पना आहे की काय ? तसे असेल तर हा मराठीचा विजय की हे तिचे अपयश ?

या सामाजिक चिंतनपर गझलांकडून रमण रणदिवे यांच्या प्रणयपर गझलांकडे वळले की मन प्रसन्न होते. त्यांची ही रचना अतिशय सुंदर आहे. तिच्यात खऱ्या अनुभूतीचा स्पर्श जाणवतो. त्याप्रमाणेच प्रणयभावनेचे काही वेगळे, अनोखे, कुतूहलजनक दर्शनही त्यामधून घडताना आढळते.

तुझ्या फुलांचे सुगंध सारे लबाड होते
दिलेस जे तू पराग तेही चहाड होते
मिठीतला चंद्रही जरी लाजराच होता
उशीवरी चांदणे तरीही उनाड होते (पल्याड)
कळेना लाजताना हा कसा रागावला चाफा ?
पुन्हा रागावतानाही जरा भांबावला चाफा (चाफा)
तू चेहरा फुलांनी का झाकतेस राणी ?
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी (बोलेल रातराणी)
नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची
अता कळ्यांना झाली घाई फुलावयाची (वेळ)

येतो, असा गझलच्या प्रणेत्यांचा दावा आहे. कोणत्याच काव्यप्रकाराला कोणताही आशय वर्ज्य असण्याचे काही कारण नाही. त्या दृष्टीने गझलांतून सामाजिक जाणीव समर्थपणे व्यक्त झाल्यास ती हवीच आहे. प्रारंभीच्या काळात समृद्ध गझलरचना करणाऱ्या माधव जूलियनांनी 'गज्जलांजली'त धुंद प्रणयगीता-बरोबर सामाजिक चिंतनपर गझलही भरपूर लिहिले आहेत. पण आजच्या गझलांतून जे सामाजिक चिंतन आढळते ते फार एकसुरी, सांकेतिक आणि जीवनातल्या बऱ्यावाइटाची सरधोपट विभागणी करणारे वाटते. रमण रणदिवे यांच्या सामाजिक आशयपर गझलांतही ही सांकेतिकता सोपे सामाजिक वर्गीकरण आढळते. उदाहरणार्थ पुढील ओळी बघ्याव्यात–

> नोंदवू फिर्याद कोठे सत्यतेची ?
> नेहमी खोटारड्यांची जीत आहे (रीत)
> खऱ्याची कोणती व्याख्या कळेना सभ्य लोकांना
> मघाशी चोर जो होता अता सावापरी झाला (भेद)
> सन्मान इथे का होतो पापाचा मला कळेना
> का न्याय तुझा रे देवा पुण्याच्या भाळी नाही (टवाळी)
> वस्तीत दुःखितांच्या काळोख धूर्त आला
> आजन्म सोबतीचा त्याने करार केला (सौदा)

या कवितापंक्तींतून आजच्या समाजाचे जे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते ते एकजात खोटे, कपटी, क्रूर, भ्रष्टाचारी, पापी असे आहे, आणि ही जाणीव व्यक्त करणाऱ्या प्रतिमाही सांकेतिक आहेत. सूर्य आणि काळोख, सत्य आणि असत्य, न्याय आणि अन्याय या जोड्या इथे वारंवार येतात. समाजाचे हे दर्शन प्रथमदर्शनी मनाला हादरवून सोडते यात शंका नाही. पण प्रश्न असा आहे की, हे चित्र संपूर्णतः खरे आहे का ? जीवनातल्या बऱ्यावाइटाची विभागणी इतकी साधी, सोपी असते का ? वस्तुस्थिती अशी आहे की, हे वास्तव घृणास्पद असले तरी त्यावर शेरे मारणारे कवी, कलावंत, लेखक हेही अपरिहार्यपणे त्याचाच एक भाग असतात. आपण सारेच या परिस्थितीला या ना त्या रूपाने हातभार लावत असतो. तेव्हा कवींनी आपण याहून वेगळे आहोत अशा आत्मतृप्त भावनेने जगावर टीका करण्यात फारसा अर्थ नसतो. हा आक्षेप मी फक्त रमणच्या कवितेवर घेत आहे

असे नाही, कारण रमणपेक्षा फार मोठ्या नामवंत कवींनाही आपल्या गझलांमधून आजच्या सामाजिक अवनतीचा, भ्रष्टाचाराचा असाच सोपा आणि सोयिस्कर अन्वयार्थ लावण्याचा मोह आवरलेला नाही. रमण यांच्या सामाजिक आशयपर गझलांत इतर मान्यवर गझललेखकांच्या कल्पनांचे, शब्दांचेही स्पष्ट, अस्पष्ट पडसाद उमटलेले दिसतात मान्यवरांचे असे पडसाद नव्या कवितांत आढळणे स्वाभाविक असले तरी समर्थनीय खास नाही. जी गोष्ट कल्पनांची तीच गोष्ट विशिष्ट शब्दांची. आजच्या गझललेखकांनी ( मूळच्या उर्दू गझलरचनेशी आपले नाते राखण्यासाठीच की काय ) काही उर्दू पर्शियन शब्दांचा आपल्या गझलांत सर्रास वापर केलेला दिसतो. चर्चा, मंजूर, नूर, लफंगा, फिर्याद, शिताफी, कायदा, मोसम हे व असेच अनेक शब्द इतक्या वेळा आजचे गझललेखक वापरतात की त्या शब्दांनी मनात आता कसलाही तरंग उमटत नाही. गझलची शैली अशी उर्दू फारसीमिश्रित असल्याखेरीज गझलला गझलपण येत नाही अशी मराठी गझलकारांची कल्पना आहे की काय ? तसे असेल तर हा मराठीचा विजय की हे तिचे अपयश ?

या सामाजिक चिंतनपर गझलांकडून रमण रणदिवे यांच्या प्रणयपर गझलांकडे वळले की मन प्रसन्न होते. त्यांची ही रचना अतिशय सुंदर आहे. तिच्यात खऱ्या अनुभूतीचा स्पर्श जाणवतो. त्याप्रमाणेच प्रणयभावनेचे काही वेगळे, अनोखे, कुतूहलजनक दर्शनही त्यामधून घडताना आढळते.

तुझ्या फुलांचे सुगंध सारे लबाड होते
दिलेस जे तू पराग तेही चहाड होते
मिठीतला चंद्रही जरी लाजराच होता
उशीवरी चांदणे तरीही उनाड होते (पल्याड)
कळेना लाजताना हा कसा रागावला चाफा ?
पुन्हा रागावतानाही जरा भांबावला चाफा (चाफा)
तू चेहरा फुलांनी का झाकतेस राणी ?
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी (बोलेल रातराणी)
नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची
अता कळ्यांना झाली घाई फुलावयाची (वेळ)

या गझलांमधून रमण रणदिवे यांची खरी काव्यवृत्ती बहराला आलेली दिसते. रमणच्या या कविता त्यांच्या स्वतंत्र कल्पकतेची, भावनोत्कटतेची आणि विशेष म्हणजे अस्सल प्रेमानुभवाची साक्ष पटवतात. 'ऋतू फुलांचा' हे संग्रहाचे शीर्षक या कवितांमुळे सार्थ झाले आहे असे वाटते.

रमण रणदिवे यांच्या कवितांचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य या संग्रहात जाणवते. हा कवी धर्माने ख्रिस्ती आहे. काव्य हाच खऱ्या कलावंताचा धर्म असतो. परंतु रमण यांच्या धर्माचा मुद्दाम उल्लेख करावा असे मला वाटते याचे कारण त्यांच्या भाववृत्तीत या धर्माचे काही सुंदर विशेष पूर्णपणे मुरलेले आहेत. त्यांच्या अनेक प्रतिमा या दृष्टीने लक्षणीय आहेत. पुढील ओळी बघाव्यात —

येथे भलेपणाची व्याख्याच व्यस्त आहे
तो चोरही स्वतःला म्हणवीत ख्रिस्त आहे  ( भिडस्त )
क्रूस हा ताजे कुणाचे रक्त येथे मागताहे ?
ही सुखी गर्दी बघ्यांची यात कोणी ख्रिस्त नाही  ( गस्त )

क्रूस, ख्रिस्त यांचे उल्लेख रमण यांच्या कवितांत अनेकदा येतात. 'रक्तबंबाळ मुका क्रूस' सारख्या प्रतिमेतून ख्रिस्ताची व्यथा ते उत्कृष्ट रीतीने प्रत्ययाला आणून देतात. त्यांची काही गीतेही ख्रिस्ती धर्माच्या कर्मकांडाची आठवण करून देणारी आहेत. 'अंधारल्या रात्री' ही कविता इंग्रजी 'साम' (Psalm) च्या धर्तीवर लिहिलेली आहे. 'कालतरूवर नववर्षाची नवकलिका फुलली' हे गीतही ख्रिस्ती धर्माच्या नववर्षाच्या स्वागतपर गीताशी नाते सांगणारे आहे. 'वरदान,' 'किमया,' 'अंधारल्या रात्री,' 'थेंबच दे नुसता,' 'तृषा', 'ईश्वरास' ही सर्वच गीते भावपूर्ण, आर्त अशी आहेत. त्यातली करुणेची, समर्पणाची भावना हृदयाला स्पर्शून जाते.

पापी देह माझा होता त्यास इजा
रडसी तू राजा धायी धायी
अशी तुझी प्रीत उपमानातीत
दुसरी खचीत नाही नाही  ( अंधारल्या रात्री )

यासारख्या ओळी वाचताना रे. टिळक यांच्या ख्रिस्तभक्तिपर अभंगांचे स्मरण

होते. विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी की रमण यांची ही धर्मभावना इतर सर्व धर्मांशी समन्वय साधणारी, सुसंवाद राखणारी अशी आहे. ते ख्रिस्ती आहेत पण त्याआधी ते मराठी आहेत, म्हणूनच ते आत्मप्रत्ययी वृत्तीने म्हणतात–

रक्तात रोज माझ्या गुंजारते मराठी
केला न मी मराठी ताठा सवंग माझा (कैफियत)

रमण रणदिवे यांच्या काही कवितांतून त्यांची काव्यविषयक भूमिका व्यक्त झाली आहे, आणि ती त्यांच्या कवितांशी सुसंगत अशी आहे. या कवीचे कवितेवर उत्कट प्रेम आहे. हे प्रेम, कवितेशी त्याचे असलेले इमान पुढीलसारख्या कवितापंक्तींमधून जाणवते–

एक मी साधा कवी साध्यासुध्यांचा
फाटलेल्या माणसांच्या भावनांचा
माझिया गीतात त्यांचा प्राण आहे! (कसोटी)
मी जगाचे ओठ झालो बोलतो सारे खरे
दुःखितांचे दुःख माझ्या अक्षरातुन पाझरे
आसवे बघण्या व्यथांची नयन दे रसिका तुझे
या स्वरांच्या चांदण्याला गगन दे रसिका तुझे! (किरण)

आणखी एका ठिकाणी कवी म्हणतो–

म्हणोत कोणी खुशाल मजला खुळा जुळारी शब्दांचा
मी प्रतिभेच्या दारामधला एक भिकारी शब्दांचा! (कवितेस)

मर्ढेकर स्वतःला 'शब्दवाही मी भिकारी' म्हणवून घेतात. कविश्रेष्ठ मुक्तेश्वर 'एक एक अक्षराची भीक मागोनि झालो कविनायक' असे स्वतःचे नम्र मनोगत प्रकट करतात. शब्दांशी असलेले जातिवंत कवीचे तेच नाते रमण यांच्या या वरील ओळींमधून प्रकट झाले आहे. ही भावना पुढील ओळींतून तर फार सुंदर आणि प्रांजळ शब्दात कवी मांडतो–

– लीन माझ्या अक्षरांचे एक साधे मागणे
जाणसी तू सर्व हेतू, काय तुजला सांगणे? (मागणे)

रमण रणदिवे यांची प्रतिमासृष्टी अशीच एका साधेपणाच्या सौंदर्याने नटलेली आहे. तिच्यावर दुसऱ्या कुठल्याही कवीची पुसट सुद्धा छाप जाणवत नाही. ' घरात रुजवलेले आभाळ ', ' विस्तवाचा संसार ', ' खिन्न आरत्यांचा गजर ', ' गात्रात खोळंबलेल्या तारका', ' भुकेच्या भाकरीचा घातकी सत्कार', ' स्मिताचे एक हिरवे पान', ' अक्षरांच्या शिंपल्यातला आशयाचा मोती ' यासारख्या अनेक अर्थपूर्ण आणि सुंदर प्रतिमा रमण यांच्या कवितेत आढळतात. चित्र-विचित्र, विक्षिप्त, अनाकलनीय किंवा दुर्बोध प्रतिमांचा रमण यांनी सोस बाळगलेला नाही. अनुभवाची अभिव्यक्ती करताना सहजपणे आकाराला आलेल्या, अनुभवाशी आंतरिक नाते सांगणाऱ्या अशाच त्यांच्या या प्रतिमा आहेत, त्या कवितांना अर्थघन करतात. आशयाला एक नवे परिमाण देतात. अर्थात यात सामान्य प्रतिमा नाहीत असे नाही. मोरपंखी आकाश, मोरपंखी भावना, वचनाची मोरपिसे यासारख्या प्रतिमा फारसे काही साधत नाहीत.

रमण रणदिवे यांच्या कवितांचे स्वरूप हे असे आहे. या कवितांत दोष नाहीत असे नाही. पण दोषांपेक्षा कवितांची गुणवत्ता अधिक मोठी आहे. कवीचे कवितेवरचे प्रेम अस्सल आहे याची साक्ष त्याच्या अनेक कवितांमधून पटते. आपली काव्यविषयक भूमिका मांडताना कवी प्रांजळ आहे हे सतत जाणवते.

रमण गझल अधिक प्रेमाने लिहितात. पण इतरही काव्यप्रकार ते वर्ज्य मानत नाहीत. क्वचित मुक्तछंदाचा त्यांनी अवलंब केलेला दिसतो. कधी छोट्या चुटकेवजा कविता ते लिहितात तर कधी गीतरचनाही ते करतात. लहान मूल फुलांनी डवरलेल्या बागेत फिरताना एकदा या फुलाकडे तर एकदा त्या फुलाकडे धाव घेते. एखाद्याचा रंग त्याला आवडतो तर एखाद्याचा गंध त्याला आकृष्ट करून घेतो. काव्याच्या उद्यानात शिरलेल्या नव्या कवीची मनःस्थिती काहीशी अशीच असते. पण त्यांचे हे भांबावलेपणही फार सुंदर, वेधक असते. रमण रणदिवे लौकरच कवितेच्या रंगगंधातून प्रत्यक्ष फुलाकडे वळतील आणि कालांतराने त्या फुलामागे दडलेल्या रसाळ परिपक्व फळांचाही त्यांना शोध लागेल असे मला निश्चयपूर्वक वाटते. तेवढे आश्वासन ' ऋतू फुलांचा ' मधल्या कविता खचित देतात.

१९ आदर्शनगर, — शांता ज. शेळके
पुणे-सातारा रोड, पुणे ३७

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ऋतू फुलांचा | १ | सत्कार | २१ |
| कसोटी | २ | डोळे | २२ |
| किरण | ३ | हुंदका | २३ |
| कवितेस | ४ | आर्जवे | २४ |
| हे सुखा | ५ | भरोसा | २५ |
| दुपार | ६ | असे कसे हे घडले गं | २६ |
| सत्य | ७ | खुणा | २७ |
| पल्याड | ८ | मौज | २८ |
| भ्रमंती | ९ | आधार | २९ |
| चाफा | १० | न्याय | ३० |
| पान | ११ | रीत | ३१ |
| बोलेल रातराणी | १२ | गजरा | ३२ |
| मेघराजा | १३ | सौदा | ३३ |
| काळजीचे घर | १४ | रंगात नाचले मोर | ३४ |
| थोडसं वेगळं | १५ | क्षणभर तू इथला | ३५ |
| चाळण | १६ | मागणे | ३६ |
| प्राजक्त | १७ | ओल्या खुणा जपाव्या | ३७ |
| रुकार | १८ | वरदान | ३८ |
| संकेत | १९ | चर्चा | ३९ |
| वार्ता | २० | अधांतरी | ४० |

स्पर्श ४१
उन्हाचे घर ४२
जात ४३
खंजीर ४४
भिडस्त ४५
निखारा ४६
शब्द माझा पाळला ४७
घन बरसले ४८
रात ४९
साजणा ५०
किमया ५१
जीवनास ५२
गाणे ५३
भान ५४
फिर्याद ५५
हृदय मागे थांबले ५६
नवकलिका ५७
निशाणी ५८
बंड ५९
धूर ६०
नोंदी ६१
कैफियत ६२
टवाळी ६३
मलातुला ६४
अंधारल्या रात्री ६५
दान ६६
जोगिया ६७
मित्रास ६८
जाळ ६९
गस्त ७०
आषाढ ७१
काळजी ७२
ओसरी ७३
वेळ ७४
पसार व्हायचे ७५
थेंबच दे नुसता ७६
फुलून जायचे ७७
रेघ ७८
भेद ७९
तुझ्यासाठी ८०
झेंडा ८१
रंग ८२
चांदरात ८३
तृषा ८४
हळूहळू ८५
काफिला ८६
मेंदी ८७
शिताफी ८८
निरोप ८९
ईश्वरास ९०
गीत ९१
अट ९२
ये नववर्षा ये ९३
नवस ९४
आबाद ९५

२६१२
२६१६४
काव्य २३।७।८०

## ऋतू फुलांचा

स्मरणांना मंद सुवास जसा मधुमास कळ्यांच्या वक्षी
गंधांचे कवळित रान फिरे बेभान मनाचा पक्षी
हा ऋतू फुलांचा कसा अनावर पिसा बहरला गात्री
लाभले मरंद–निधान सुधेचे दान कमलिनी – पात्री

## कसोटी

दाद देण्याचे तुम्हाला भान आहे
आज शब्दांची कसोटी छान आहे

या जरा सांभाळुनी कंठी सुरांनो
वावगे बोलू नका हो अक्षरांनो
जाणकारांचा शहाणा कान आहे
आज शब्दांची कसोटी छान आहे

वेदना माझ्या उरी सांभाळतो मी
आसवे शब्दात माझ्या माळतो मी
हासण्याचे नाटकी अवसान आहे
आज शब्दांची कसोटी छान आहे

एक मी साधा कवी साध्यासुध्यांचा
फाटलेल्या माणसांच्या भावनांचा
माझिया गीतात त्यांचा प्राण आहे
आज शब्दांची कसोटी छान आहे

## किरण

आज माझ्या अक्षरांना वचन दे रसिका तुझे
या स्वरांच्या चांदण्याला गगन दे रसिका तुझे

अक्षरांच्या लोचनातुन हृदय जरि हे निथळले
मी तुझ्यासाठीच केवळ बहर माझे उधळले
कल्पना-वेलीस माझ्या सुमन दे रसिका तुझे
या स्वरांच्या चांदण्याला गगन दे रसिका तुझे

मी जगाचे ओठ झालो, बोलतो सारे खरे
दुःखितांचे दुःख माझ्या अक्षरातुन पाझरे
आसवे बघण्या व्यथांची नयन दे रसिका तुझे
या स्वरांच्या चांदण्याला गगन दे रसिका तुझे

काळजामाजी फुलांच्या भावना ओथंबल्या
एवढ्यासाठीच गात्री तारका खोळंबल्या
आज कवितेच्या उषेला किरण दे रसिका तुझे
या स्वरांच्या चांदण्याला गगन दे रसिका तुझे

## कवितेस

कविते ये ना जवळ जराशी प्रेम तुझ्यावर करतो मी
तुझ्या सुगंधी मधुमासाने पहा कसा मोहरतो मी

दिलेस हळव्या चंद्रमिठीतुन पुनवेचे तू श्वास मला
तुझ्या गुलाबी नक्षत्रांचे दिलेस तू आकाश मला
त्या आकाशी इंद्रधनूचे रंग अनोखे भरतो मी
कविते ये ना जवळ जराशी प्रेम तुझ्यावर करतो मी

दवारलेल्या प्राजक्ताला तुझा इषारा छळतो ग
शैशवातल्या चाफ्यालाही तुझा शहारा कळतो ग
अशाचसाठी त्या चाफ्याच्या अंगणात वावरतो मी
कविते ये ना जवळ जराशी प्रेम तुझ्यावर करतो मी

म्हणोत कोणी खुशाल मजला खुळा जुळारी शब्दांचा
मी प्रतिभेच्या दारामधला एक भिकारी शब्दांचा
एकेका दानासाठीही जन्म जन्म भिरभिरतो मी
कविते ये ना जवळ जराशी प्रेम तुझ्यावर करतो मी

## हे सुखा !

रोज सत्कार जेव्हा घडू लागले
हार ओशाळवाणे रडू लागले

काल गुंतेच गुंते मला भेटले
आज आकाशही उलगडू लागले

रक्तबंबाळ हा ऊस झाला मुका
हे खिळे का बरे ओरडू लागले ?

तू वसन्ता मला दे कितीही दगे
स्वप्न माझे फुलांना पडू लागले

मी प्रकाशात जेव्हा तुझ्या शोधले
शब्द माझे मला सापडू लागले

राहिली चार स्वप्ने खड्यांसारखी
लोक जेव्हा मला पाखडू लागले

हे सुखा मी तुझी काळजी सोडली
दुःख माझे मला आवडू लागले

## दुपार

उगीच आपुली अशी व्यथा दळू नये
तुझ्याच लोचना तुझे रडे कळू नये

जपून जाळ येथल्या गरीब झोपड्या
चुकून बंगला तुझा नवा जळू नये

अनेक चेहऱ्यांत मी निहाळले मला
कधीच आरसा असा मला मिळू नये

तुझ्यापरी असंख्य ही तृषार्त माणसे
उजाड पावसातुनी असे पळू नये

किती किती मनोगते मुकीच राहिली
गडे अजून चंद्र हा तुझा ढळू नये

अरे कलंदरा तुला दुपार धार्जिणी
लबाड सावलीकडे कुणी वळू नये

## सत्य

श्वापदांना भाळणारी माणसे मी पाहिली
माणसांना टाळणारी माणसे मी पाहिली

रोज मी गोष्टी सुखाच्या ऐकल्या होत्या तरी
रोज अश्रू ढाळणारी माणसे मी पाहिली

का जगाला सांगशी तू धर्मनीतीच्या कथा ?
एकमेका जाळणारी माणसे मी पाहिली

लोक हो येथे गुणांची कोण पूजा बांधतो ?
चेहरे ओवाळणारी माणसे मी पाहिली

दीनदुबळ्यांचेच जेव्हा कापले गेले गळे
इभ्रती सांभाळणारी माणसे मी पाहिली

न्याय मागायास गेले सत्य जेव्हा पोरके
मौन तेव्हा पाळणारी माणसे मी पाहिली

## पल्याड

तुझ्या फुलांचे सुगंध सारे लबाड होते
दिलेस जे तू पराग तेही चहाड होते

मिठीतला चंद्रही जरी लाजराच होता
उशीवरी चांदणे तरीही उनाड होते

कुणी न आले कधी व्यथेच्या घरात माझ्या
खुले जरी खिन्न आसवांचे कवाड होते

तुला कळूही दिले न मी नावगाव माझे
भणंग वाऱ्यावरीच माझे बिऱ्हाड होते

मला तुझी लागली न केव्हाच गंधवार्ता
निरोपही धोरणी दिशांचे उजाड होते

मला न शब्दातही तुझा लागला सुगावा
तुझे किती आर्त अर्थ प्राणापल्याड होते

## भ्रमंती

कुठल्यातरी व्यथेच्या बहारात हिंडलो मी
नव्हती फुले कुठेही जहरात हिंडलो मी

माझ्याच सावलीला तुडवीत रोज गेलो
चढत्या उन्हात माझ्या दिनरात हिंडलो मी

प्रत्येक मंदिराचे पाषाण ये म्हणाले
अन् खिन्न आरत्यांच्या गजरात हिंडलो मी

झाली न भेट माझी कुठल्याच सार्थकाशी
माझ्या प्रतारणेच्या प्रहरात हिंडलो मी

मीही अखेर त्यांचा आरोप मान्य केला
फुटला न शब्द त्यांना अन् गात हिंडलो मी

वस्तीत दुःखितांच्या मजला कळून आले
तेव्हा जनावरांच्या शहरात हिंडलो मी

## चाफा

कळेना लाजताना हा कसा रागावला चाफा ?
पुन्हा रागावतानाही जरा भांबावला चाफा

तशी रात्रीच मी केली तुझी चर्चा सुगंधाशी
सकाळी का बरे माझ्या मनी डोकावला चाफा ?

म्हणे बेभान वाऱ्याने ऋतूंची कौतुके केली
कळाले एवढा कैसा तुझा लाडावला चाफा

कशाला पारिजाताशी घरोबा मी तरी जोडू ?
अता रक्तात या माझ्या सामावला चाफा

बरे झाले गुलाबाला कळाले एवढे तेव्हा
उशीला ऐनवेळी का तुझा हा भावला चाफा

पहा आभाळ स्वप्नांचे कसे गंधाळते आहे
निशेने तारकांमाजी तुझा का ओवला चाफा ?

## पान

जवळ परंतू जवळपणाचे दोघांनाही भान हवे
अशा समंजस एकान्ताचे मला-तुला उद्यान हवे

प्रीतीचा प्राजक्त फुलावा गात्रांमधुनी धुंद असा
स्पर्शावाचुन होत रहावा स्पर्श मुलायम रेशिमसा
मिटल्या नयनी चंद्रमिठीला आभाळाचे दान हवे
जवळ परंतू जवळपणाचे दोघांनाही भान हवे

नव्याजुन्या स्वप्नांची यादी तुझ्यापुढे मी वाचावी
लाजत लाजत ओळ ओळ तू मोरपिसांनी टाचावी
त्या स्वप्नांच्या नाजुकतेचे सत्याशी संधान हवे
जवळ परंतू जवळपणाचे दोघांनाही भान हवे

जन्माने आजन्म जपाव्या मधुमासाच्या गंधखुणा
फुलाफुलांनी बहरुन यावे आयुष्याचे रान पुन्हा
त्याआधी पण तुझ्या स्मिताचे एकच हिरवे पान हवे
जवळ परंतू जवळपणाचे दोघांनाही भान हवे

## बोलेल रातराणी

तू चेहरा फुलांनी का झाकतेस राणी ?
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी

लाजेत रंगलेला मेंदीस रंग देऊ
आभाळ पापण्यांनी उचलून आज घेऊ
बेभान चांदण्यांची गाऊ सुरेल गाणी
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी

हे मोरपीस माझ्या गालावरी फिरू दे
स्पर्शात रेशमाच्या अंगांग मोहरू दे
ओठावरी उरावी माझी तुझी निशाणी
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी

ऐकेन मी जरासा आवाज काकणांचा
संवाद लाजणारा होईल अंतरांचा
बोलू नकोस काही बोलेल रातराणी
आता कुठे गुलाबी झाली सुरू कहाणी

## मेघराजा

अरे पावसा पावसा कधी पाहशील खाली ?
तुझ्या भेटीसाठी सृष्टी कशी कासाविस झाली

तुझ्या येण्याचे निरोप देती खोटारडे वारे
देह वाळला भुईचा, सारी उजाड शिवारे
थेंबाथेंबासाठी झाली रानावनाची काहिली
अरे पावसा कधी पाहशील खाली ?

उभ्या आयुष्याचा झाला कसा पाचोळा पाचोळा
आतातरी मेघराजा तुझा भरू दे रे डोळा
का रे कोपलास ऐसा ? दुःखी आसवे म्हणाली
अरे पावसा पावसा कधी पाहशील खाली ?

उभे जगाच्या डोळ्यात तुझे ढगाळ आभाळ
मन-मोराच्या पायात कधी बांधशील चाळ ?
नाचे हिरवा पिसारा स्वप्नभारल्या महाली
अरे पावसा पावसा कधी पाहशील खाली ?

## काळजीचे घर

डोळ्यामधून डोळे नेलेस तू जरी
होईल बोलबाला याचा कधीतरी

मी बोललेच नाही बोलू तरी कसे ?
आभाळ ओंजळीने तोलू तरी कसे ?
मी बावरून गेले तेव्हा खरीखुरी
होईल बोलबाला याचा कधीतरी

डोळ्यांमधील तारे तेजाळलेस तू
डोळ्यांवरून डोळे ओवाळलेस तू
सांगून रात्र गली चंद्रास लाजरी
होईल बोलबाला याचा कधीतरी

हा रोजचा पहारा टाळायचा कसा ?
डोळ्यात जन्म सारा काढायचा कसा ?
का याच काळजीच्या मी वावरू घरी ?
होईल बोलबाला याचा कधीतरी

## थोडसं वेगळं....

नको नको म्हणत होकार देत होतीस
होकार देता देता " नको " म्हणत होतीस
तुझ्या " त्या " " नको " ला सर्व काही हवं होतं
मला हे कळलं होतं
मी आभाळात घर बांधलं होतं
तुझं थोडंसं वेगळं होतं
तू घरातच आभाळ सजवलं होतंस

## चाळण

ती चटोर नक्षत्रांना बाहेर पिटाळत होती
ती चंद्र तिचा त्या रात्री अंतरी निहाळत होती

मी जगण्याची भूपाळी ऐकवीत जेव्हा होतो
ती उदास काळोखाचे संदर्भ उगाळत होती

मी काय तुझ्या स्वप्नांच्या लाटांनी भिजलो होतो ?
एकेक ओळ माझ्याही प्राणांत खळाळत होती

त्या जमलेल्या सुमनांची केवढी निराशा झाली ?
ती मलाच वेचत होती, ती मलाच माळत होती

जे नको तेच बघणारे आभाळ समंजस होते
कोवळ्या उन्हाचे डोळे ती उगीच टाळत होती

माझ्याच जन्मगाथेची मी वाचत बसलो पाने
अन् मला वेदना माझी सावकाश चाळत होती

## प्राजक्त

मज कधी आले न येथे व्यक्त होता
हाय ! बोभाटाच माझा फक्त होता

बंद मी डोळ्यांत केले आसवांना
पापण्यांचाही पहारा सक्त होता

जीवनाने सारखी केली टवाळी
जीव माझा का बरे आसक्त होता ?

नाव त्याने घेतले नाही प्रभूचे
तो बिचारा माणसांचा भक्त होता

क्रूस हा अद्यापही रक्ताळलेला
रंग प्रेमाचा तसा आरक्त होता

काल रात्री केवढी केलीस जादू ?
माझिया गात्री तुझा प्राजक्त होता

## रुकार

होकारही तुला तो तेव्हा नकार होता
तो जीव घ्यावयाचा पहिला प्रकार होता

जेव्हा तुला फुलांच्या गर्दीत शोधले मी
तेव्हा सुगंध कोठे झाला पसार होता ?

आले जरी अखेरी माझे भरून डोळे
एकेक थांबलेला अश्रू चुकार होता

माझ्यावरी कशाला केले इलाज त्यांनी ?
साऱ्याच औषधांना माझा विकार होता

तू ओठ मागण्याची केलीस फार घाई
ओठात काय माझ्या तेव्हा रुकार होता ?

## संकेत

जीवनाचे जीवघणे बेत होते
दाद शापासारखी ते देत होते

मी कशासाठी दिल्या हाका दिशांना ?
गीत माझे माझिया हाकेत होते

मी मणी माळेतले काढीत होतो
पालखी तेही रिकामी नेत होते

कोणती माझी चिता होती कळेना ?
स्वप्न माझे कोणत्या राखेत होते !

मी न केला वेदनेचा बोलबाला
लोचनी अश्रू तरीही येत होते

मी जरी संसार केला विस्तवाचा
चांदणे चाहूल माझी घेत होते

शांतल्या तेव्हा जरी तारुण्य-लाटा
वादळाचे वेगळे संकेत होते

## वार्ता

तुझी प्रीती जरी माझ्या फुलांना टाळते आहे
तुझे काटेच मी माझ्या उरी सांभाळते आहे

झळा ज्या लागल्या त्याही तुझ्या दुःखा बऱ्या होत्या
सुखाची दूरची छाया जिवाला जाळते आहे

गळाया लागली सारी जुनीही तीव्र ती पाने
कशाला आज आयुष्या तुला मी चाळते आहे ?

जरी नेलास तू माझा गुलाबी चंद्र स्वप्नांचा
तुझे हे चांदणे येथे गडे घोटाळते आहे

मघाशी उंच लाटांची मला का वाटली भीती ?
अता मी शांत झालेल्या जळी फेसाळते आहे

पहाटेच्या दवानेही तुला नाही दिली वार्ता
तुझ्यावाचून मी रात्री कशी गंधाळते आहे

## सत्कार

माझेच लोक मजला तिरडीत नेत होते
माझ्यासमोर माझे जाळीत प्रेत होते
हे लोक रोज माझा सत्कार योजताना
आतून विस्तवाचे शिजवीत बेत होते

## डोळे

डोळ्यांचे खेळ डोळ्यावर आले
तरी
डोळे चुकवून डोळे भेटतच होते
हजार डोळ्यांनी डोळ्यांतच भिंत बांधली
तरी
डोळ्यांतले चांदणे डोळ्यांत शिरतच होते

## हुंदका

चितेसमोर थांबला बनेल हुंद्का
किती उदास हा कुणी म्हणेल हुंदका
जनासमोर फक्त हा रडेल नाटकी
मनात मात्र कैकदा हसेल हुंद्का

## आर्जवे

तू दिलेल्या चांदण्यांनी ढाळली का आसवे ?
मी कसे सांगू नभाला ? मेघ येती आडवे

मी दिला होकार तेव्हा मोगरा का भारला ?
हात हाती गुंफताना देह का झंकारला ?
का फुलांनी गंधगाणे गाइले माझ्यासवे ?
मी कसे सांगू नभाला ? मेघ येती आडवे

मोरपंखी भावनांनी भाव माझा जाणला
मी जुईच्या पापण्यांनी चंद्र खाली आणला
आज तो चंद्रोत्सवाचा सोहळा मज आठवे
मी कसे सांगू नभाला ? मेघ येती आडवे

का अशी केलीस माझी वंचना तू साजणा ?
मी जपाव्या की पुसाव्या लाल मेंदीच्या खुणा ?
का अता दुःखी सुखांची मी करावी आर्जवे ?
मी कसे सांगू नभाला ? मेघ येती आडवे

## भरोसा

धुंद असू दे चंद्र नभीचा धुंद असू दे रात
मला भरोसा येइल तेव्हा देइन हाती हात

या वचनांच्या मोरपिसावर
नकोस झुलवू माझे अंतर
जरी फुलांचे आले अंबर पुनवेच्या दारात
मला भरोसा येइल तेव्हा देइन हाती हात

नक्षत्रांची स्वप्ने माळुन
शब्द थबकले संयम पाळुन
काळिज गेले जरि गंधाळुन श्वासांच्या रानात
मला भरोसा येइल तेव्हा देइन हाती हात

तुझ्या निरागस डोळ्यांमधले
भाव निरामय मला कळाले
तरी सुखाने सुख चाचपले हळव्या प्राजक्तात
मला भरोसा येइल तेव्हा देइन हाती हात

## असे कसे हे घडले ग ?

जन्मापासुन ज्याच्यासाठी जीव अनावर झुरला ग
अता कुठे तो मेघ सावळा गात्रांमधुनी झरला ग

भिजून गेले चिंब चिंब मी तारुण्याच्या लाटांनी
किती थबकले प्रणयसुखाचे रेशिमपक्षी काठांनी
ढळता ढळता तोल मनाचा कसातरी सावरला ग
अता कुठे तो मेघ सावळा गात्रांमधुनी झरला ग

इथेतिथे होतात सुगंधी प्राजक्ताचे भास मला
पानांच्या दवबिंदूंमधले विचारते आकाश मला
"कसा अवेळी ऋतू फुलांचा झंकारत मोहरला ग ?"
अता कुठे तो मेघ सावळा गात्रांमधुनी झरला ग

काय करू मी ? कळे न काही, असे कसे हे घडले ग ?
मनातल्या चंद्राचे काळिज स्पर्शातुन उलगडले ग
मंतरलेल्या गगनमिठीचा श्वास श्वास बावरला ग
अता कुठे तो मेघ सावळा गात्रांमधुनी झरला ग

## खुणा

कळे न काय नेमके तुला बघून जाहले
मलाच नावगाव मी पुन्हा पुन्हा विचारले

उन्हात मी उभी तरी दिसे समोर तारका
निहाळते मनातला मधाळ चंद्र सारखा
मिटून लोचने तुझ्या मिठीत मी शहारले
मलाच नावगाव मी पुन्हा पुन्हा विचारले

दुरून काळजावरी तुझीच लाट आदळे
दुरून मंदमंदसा तुझा सुगंध दर्वळे
दुरून वाटते मला कुणीतरी पुकारले
मलाच नावगाव मी पुन्हा पुन्हा विचारले

निघून चाललास का असा मधेच साजणा !
अजून राहिल्या किती टिपायच्या तुझ्या खुणा
अजून मी तरी कुठे हवी तशी फुलारले ?
मलाच नावगाव मी पुन्हा पुन्हा विचारले

## मौज

आज बोरीबाभळीलाही चंदनाचा गंध आहे
सर्व भाषणांच्या ओठी गोड गोड गुलकंद आहे

जेव्हा नेत्री धूळ पेरीत घोषणांचा रथ निघून गेला
खरेपणाचा सूर्य तेव्हा उगवला नाही, विझून गेला

धूळ माखल्या डोळ्यांनीही आम्ही एक मौज पाहिली
शूर सिंहाचे कातडे पांघरून लांडग्यांचीच फौज गेली

काखेमध्ये हात खुपसून आम्ही नुसते बघत राहिलो
उच्छिष्टावर जीव टाकत मरत मरत जगत राहिलो

(उकिरड्याच्याच लायकीचा) आमचा समाज "झकास" असतो
निवडुंगाला काय कधी प्राजक्ताचा वास असतो ?

# आधार

तो गुलाबी वेदनांचा बेरका बाजार होता
तो सुखाच्या आसवांचा मोसमी व्यापार होता

कालच्या कोजागिरीने फार पंचाईत केली
चांदणे बेचैन होते चंद्रही बेजार होता

औषधे घेऊन त्यांची मी बरा झालोच नाही
जीव ज्याने घेतला तो औषधी आजार होता

काय तेव्हा बोललो मी हे मला माहीत नाही
तो न होता शब्द माझा तो तुझा झंकार होता

ऐकले जेव्हा तुझ्या मी काळजाचे मंद ठोके
तो मला नाकारणारा लाजरा होकार होता

नाइलाजानेच झाला एक सौदा इभ्रतीचा
तो भुकेच्या भाकरीचा घातकी सत्कार होता

आसवे वाळून गेली हे किती वाईट झाले
आसवांना आसवांचा केवढा आधार होता

## न्याय

लिहीत होती बाग, कळेना काय फुलांनी ?
मुळीच वाचू दिले न मजला हाय फुलांनी

सांगायाचे कसे तिला ? काळजीत होतो
मला सुचविला त्या वेळी पर्याय फुलांनी

अरे वसंता, तुलातरी हे कळेल का रे !
कशास धरले आज हवेचे पाय फुलांनी ?

तुझ्या सुगंधी तारुण्याच्या अभिलाषेने
गोळा केला भृंगांचा समुदाय फुलांनी

जरी मिठीच्या फिर्यादीला उशीर झाला
अखेर केला मनासारखा न्याय फुलांनी

## रीत

कोण जाणे कोणती ही रीत आहे ?
चेहरा का चेहऱ्याला भीत आहे ?

लागली देवास आता काळजी ही
धर्मवेडा धर्म का जाळीत आहे ?

लाभते ऐश्वर्य येथे श्वापदांना
माणसांचा जन्म का शापीत आहे ?

नोंदवू फिर्याद कोठे सत्यतेची ?
नेहमी खोटारड्यांची जीत आहे

ऐकला कोणी न टाहो दुःखितांचा
प्रेत माझे, हुंदका दाबीत आहे

कोण म्हणतो "झिंगण्याचा षोक नाही" ?
रोज मी आयुष्य माझे पीत आहे

गाइले ते एकट्याचे दुःख नाही
हे जगाच्या वेदनांचे गीत आहे

## गजरा

केला सुरू फुलांनी नखरा जराजरासा
आला खुषीत जेव्हा गजरा जराजरासा

केला तिने खुबीने जेव्हा मला इषारा
नाराज होत गेला दुसरा जराजरासा

साधा सवाल होता त्या रेशमी मिठीचा
बघतो दिवा कशाला उपरा जराजरासा

उरला न प्रश्न काही लाजेत गुंतण्याचा
हा स्पर्श धीट झाला बुजरा जराजरासा

आतून काळजाला गेला तडा तरीही
हा चेहरा असू दे हसरा जराजरासा

## सौदा

फसवून चंद्र ज्यांनी कैदेत पार केला
त्यांनीच सूर्य आता चौकात ठार केला

वस्तीत दुःखितांच्या काळोख धूर्त आला
आजन्म सोबतीचा त्याने करार केला

आयुष्य यापुढेही काट्यामधेच काढू
नाही कधी फुलांचा आम्ही विचार केला

आम्हास मारण्याची चिंता नकोच त्यांना
आम्हीच सूळ अमुचा आहे तयार केला

ही केवढी चलाखी त्या चोरट्या ठगांची !
तारा खरेपणाचा ज्यांनी पसार केला

बाजार वेदनांचा भडके अशाचसाठी
मी आज सोसण्याशी सौदा उधार केला

## रंगात नाचले मोर

लाडात सांग कानात कधी पानांत वाजला वारा ?
काठात सांग थाटात कधी लाटांत लाजला तारा ?

चालली सवे बोलली नवे डोलली तळ्याच्या काठी
बेभान घेतली आण, गुंतला प्राण कळ्यांच्या देठी

सावल्या अती भावल्या मती धावल्या जलाच्या छंदी
रंगले उभय, दंगले हृदय, गुंगले फुलांच्या गंधी

मी तुला मनोहर फुला बांधिला झुला फुलांचा कवनी
हासली मला भासली स्थला पातली मेनका अवनी

अधरात गीत, पदरात प्रीत, संगीत लयीतुन जुळले
उधळीत गंध, कवळीत बंध, मधुगुपित जुईतुन कळले

श्वासात, मंदवासात, धुंद श्वासात चांदणे न्हाले
भानात दान, प्राणात जाण, गगनात गोंदणे झाले

अंगात जोष, संगात तोष, रंगात नाचले मोर
त्या क्षणा, मोद हो दुणा, बिलगल्या खुणा पुन्हा मनमोर

## क्षणभर तू इथला

मानवा क्षणभर तू इथला
अवचित येता निरोप वरचा होशिल तू तिथला

क्षणभंगुर हे अवघे जीवन
ज्यास समजशी तू नंदनवन
का मग वेड्या फिरसी वणवण ? सजवित देहाला

सूर्यासंगे फुले उमलती
सूर्यासंगे फुले निखळती
जन्म भटकतो मरणाभवती, न्याय मला रुजला

राजा अथवा असो भिकारी
पारध करितो मरण–शिकारी
देह काय मग ? माती सारी, मातीचा पुतळा

## मागणे

अक्षरांच्या शिंपल्यांचे ऐकुनी घशील का ?
आशयाच्या मोतियांचे दान तू देशील का ?

स्वातिच्या स्वप्नात झाली गुंग सारी अक्षरे
एवढ्यासाठीच त्यांचा जन्म एकाकी झुरे
तू दवाच्या पावलांनी एकदा येशील का ?
अक्षरांच्या शिंपल्यांचे ऐकुनी घेशील का ?

मी तुझ्यासाठी धरावी रोज हाती लेखणी
अक्षरामाजी करावी तारकांची पेरणी
कल्पनेच्या अंबरी तू गीत हे नेशील का ?
अक्षरांच्या शिंपल्यांचे ऐकुनी घेशील का ?

लीन माझ्या अक्षरांचे एक साधे मागणे
जाणसी तू सर्व हेतू, काय तुजला सांगणे ?
सानुल्या प्रतिभेस माझ्या पंख तू देशील का ?
अक्षरांच्या शिंपल्यांचे ऐकुनी घेशील का ?

## ओल्या खुणा जपाव्या

डोळ्यांत बाहुल्यांच्या मी सावल्या टिपाव्या
मेंदीतल्या नभाने ओल्या खुणा जपाव्या

वाऱ्यावरून यावी धुंदीत रातराणी
गंधाळल्या मनांची गंधीत गात गाणी
गाण्यातल्या कहाण्या जगण्यात मोहराव्या
मेंदीतल्या नभाने ओल्या खुणा जपाव्या

जी पेटली मधाने ती सर्व आग प्यावी
पंखात झोपलेल्या पक्ष्यास जाग यावी
मेघात तारकाही लाजून लाल व्हाव्या
मेंदीतल्या नभाने ओल्या खुणा जपाव्या

रेशीम कल्पनांचा प्राजक्त दर्वळावा
माझ्यातुझ्या फुलांचा पाऊस कोसळावा
अन् चांदण्या सुखाच्या प्राणात डोकवाव्या
मेंदीतल्या नभाने ओल्या खुणा जपाव्या

## वरदान

तुज गौरविता मिटु दे माझ्या आयुष्याचे पान
प्रभो मज असेच दे वरदान

जग-मोहाच्या भयाण शहरी
नको नको ते केले जहरी
ते सोडुनी अष्टौप्रहरी गावे तव गुणगान

तव सेवेचा मंगल ठेवा
मकरंदाहुनि मधुतम मेवा
भ्रमर मनाचा त्यातच देवा व्हावा नित रममाण

तुझ्या दिशेला पाय वळू दे
षड्रिपु अवघे दूर पळू दे
कणाकणाला माझ्या कळु दे तव भक्ती-महिमान

चर्चा

भाकरीच्या बातमीची एवढी चर्चा नको
भीक देणाऱ्या हमीची एवढी चर्चा नको
हे उपाशी पोट मेले, ते मराया टेकलेले
रोज मरणाऱ्या कृमींची एवढी चर्चा नको

## अधांतरी

माझ्या फाटलेल्या हृदयाला
जर तू
अंतरीक सहानुभूतीचा
टाका घातला असता
तर
हृद्यात जपलेल्या भावना
लोंबल्या नसत्या अशा
अधांतरी...अधांतरी..

## स्पर्श

हात जेव्हा तुझा मी धरू लागलो
आतल्या आत मी मोहरू लागलो
स्पर्श होता फुलाचा असा कोवळा
मी फुलांनी फुले कातरू लागलो

## उन्हाचे घर

आसवांना पुन्हा आवरू लागलो
हासणे मी पुन्हा पांघरू लागलो

हे वसंता जरी दूर गेलास तू
मी तुझ्यासारखा मोहरू लागलो

जीवनाने जरी लाख लाथाडले
मी पुन्हा बोट त्याचे धरू लागलो

जन्म काट्यात मी काढला हा तरी
मी फुलांना कसा घाबरू लागलो ?

वेदनांचे खरे पाहतो चेहरे
मी मुखोटे जुने कातरू लागलो

ओढ नाही तुझ्या सावलीची मला
मी उन्हाच्या घरी वावरू लागलो

## जात

आणू नका कुणीही हुडकून जात माझी
जगणार मी न येथे लपवून जात माझी

हा ही शिवीच देतो, तो ही शिवीच देतो
मजला नको बला ही बदलून जात माझी

त्यांच्याच फायद्याचे मी बोललो तरीही
एकेक स्वार्थ गेला फितवून जात माझी

टाचू कुणाकुणाचे आयुष्य मी ! कळेना
ते राजरोस गेले उसवून जात माझी

रक्तामधेच ज्यांच्या जातीयवाद आहे
पुसतात तेच सारे हटकून जात माझी

" माणूस " देव माझा, मी भक्त माणसांचा
आधीच टाकली मी ठरवून जात माझी

फुंकून कान त्यांनी नेला प्रकाश तेव्हा
दारात सूर्य आला विसरून जात माझी

## खंजीर

पेटल्या सरणावरी हे रोजचे जळते मढे
वांझ मायेला जगाच्या आज का आले रडे ?

थांबले दारात माझ्या लोक दाटीवाटिने
ढाळती अश्रू परंतू आतुनी ते कोरडे

देखण्या आपूलकीचे हे चहाटळ हुंदके
अर्पिती वरचे उमाळे जे क्षणाच बुडबुडे

सांगती पळ काढताना सांत्वनाच्या सावल्या
तो पहा तो पश्चिमेला सूर्य रक्ताचा बुडे

दावुनी चेहरे इमानि, बेइमानी माणसे
सभ्य इथल्या संस्कृतीचे गीत गाती चहुकडे

हे विषारी रंग फसव्या माणसाचे निरखुनी
धाडसी काळीज माझ्या मृत्युचेही धडधडे

कोण आला हार घेऊन गच्च या गर्दीतुनी ?
आतला खंजीर त्याचा शोधि माझे आतडे

## भिडस्त

येथे भलेपणाची व्याख्याच व्यस्त आहे
तो चोरही स्वतःला म्हणवीत ख्रिस्त आहे

गगनात सूर्य अमुचा तेजाळतो परंतू
प्रत्येक प्राण इथला अंधार-ग्रस्त आहे

सांगे नव्या गुन्ह्याला चाकू सुरे दुधारी
पैसा महाग वेड्या माणूस स्वस्त आहे

कोणी कुणा कथावी रक्ताळली कहाणी ?
अपुल्याच जीवनाला जो तो त्रयस्थ आहे

मज दूरचा किनारा हाकारतो कशाला ?
पाण्यात भोवऱ्यांची चौफेर गस्त आहे

खुर्चीमधून आला ढेकूण झिंगणारा
प्राशून रक्त अमुचे तो तंदुरुस्त आहे

" लावा सुरुंग लावा " बोलेचना कुणीही
बोलू कसा ? जरासा मीही भिडस्त आहे

## निखारा

घेउन जा हृदयात नभाचा निळा किनारा
ठेव उसळत्या लाटेवर तू एकच तारा

कुठे तुला मी जन्मासाठी जन्म मागते ?
एकच दे रे पीस स्मिताचे, नको पिसारा

नक्षत्रांच्या तुझ्या महाली येउ कशी मी ?
माझ्यावर येथल्या धुळीचा खडा पहारा

प्रकाशातुनी तुझी पालखी पुढेच ने तू
या अवसेचा आवरते मी खिन्न पसारा

आयुष्याने करार केला डागडुजीचा
दिलाच नाही श्वासांनीही मला निवारा

लाजेखातर स्मशानातही ये शिल तेव्हा
जपून माझ्या राखेमधला शोध निखारा

## शब्द माझा पाळला

मी तुला तेव्हा दिलेला शब्द माझा पाळला
मी तुझ्यासाठीच कविते जन्म सारा जाळला

वाजते प्राणात माझ्या अक्षरांची बासरी
अंतरंगी रोज फुलती भाव-सुमने हासरी
त्यां फुलांचा धुंद गजरा मी जगाला माळला
मी तुला तेव्हा दिलेला शब्द माझा पाळला

आशयासाठीच केले अक्षरांचे लाड मी
लावले शब्दात माझ्या तारकांचे झाड मी
वास्तवाच्या वेदनेचा ग्रीष्म मी सांभाळला
मी तुला तेव्हा दिलेला शब्द माझा पाळला

ऐकली खोट्या जगाची मी प्रशंसा नाटकी
माणसे जोडीत गेलो दीनदुबळी फाटकी
रोज मी आषाढ माझ्या आसवांचा टाळला
मी तुला तेव्हा दिलेला शब्द माझा पाळला

## घन बरसले

अमृतकण उधळित घन आज बरसले
कांचनक्षण कवळित मन आज हर्षले

धरणीवर हर्षाचा सिंधु पसरला
भिजुनि चिंब प्राण प्राण भान विसरला
पवन-सूर, पर्णनुपुर धुंद वाजले
अमृतकण उधळित घन आज बरसले

सुखद संग हाच जाणती विहंग ते
रंगुनि रंगात दंग सकल भृंग ते
सुमनातुन थेंबांचे मोर नाचले
अमृतकण उधळित घन आज बरसले

मातीचा गंध धुंद घुमे अंबरी
मधुमरंद तोच गमे सृष्टी अंतरी
रंगातुन इंद्रधनू हळुच बोलले
अमृतकण उधळित घन आज बरसले

## रात

या गुलाबी चांदण्यांना ज्ञात आहे
आज माझ्या साजणाची रात आहे

चंद्र का खोळंबला दारात माझ्या ?
साजणा गंधाळला श्वासात माझ्या
मोगरा बेभान गाणे गात आहे
आज माझ्या साजणाची रात आहे

मी कुणासाठी नवा शृंगार केला ?
या दिव्याने का बरे अंधार केला ?
काय सांगू ? मी कुठे भानात आहे ?
आज माझ्या साजणाची रात आहे

ही पहा प्राणास त्याची हाक आली
अन् फुले झंकारण्याची वेळ झाली
लाजरा गजरा खरा लाडात आहे
आज माझ्या साजणाची रात आहे

## साजणा

अताच चाललास का निघून साजणा ?
पहाट व्हायची गडे अजून साजणा

अजून मी कुठे तुझ्या नभास भेटले ?
अजून चांदणे कुठे तुझे लपेटले ?
अजून यामिनी उभी नटून साजणा
अताच चाललास का निघून साजणा

अजून अंग अंग हे फुलायचे किती ?
अजून रंगरंगही खुलायचे किती ?
अजून घ्यायचे तुला टिपून साजणा
अताच चाललास का निघून साजणा ?

तुझ्याविना वसंत हा मला सुना सुना
खुणावती कळ्या फुले तुला पुन्हा पुन्हा
फुलातला मरंद घे लुटून साजणा
अताच चाललास का निघून साजणा ?

## किमया

इथले तारे वारे सारे म्हणती वारंवार
तुझाच जयजयकार देवा तुझाच जयजयकार

तुझीच धरणी तुझेच अंबर
तुझीच सरिता अथांग सागर
खळाळत्या लाटांतुन चाले तुझाच नामोच्चार
तुझाच जयजयकार देवा तुझाच जयजयकार

तव शब्दाने सांज उतरते
रात्र निसटते पहाट येते
रोज नव्या किरणातुन होतो तुझाच साक्षात्कार
तुझाच जयजयकार देवा तुझाच जयजयकार

साधे सोपे माझे अक्षर
तुला वानिते प्रभो निरंतर
जरि तव किमया हे करुणाकर उपमानाच्या पार
तुझाच जयजयकार देवा तुझाच जयजयकार

## जीवनास

तू असा नाराज तरिही मी तुला रिझवीत गेलो
बोल केव्हा जीवना रे मी तुला खिजवीत गेलो ?

मी कधी आकांत माझा कोणत्या दारात नेला ?
सारखा वणवा मनाचा एकटा विझवीत गेलो

मी जरी माझ्या व्यथांचे टाळले आषाढ-श्रावण
पण धरेच्या आसवांनी मी मला भिजवीत गेलो

सोबती मारेकऱ्याचे काम सांभाळीत होते
मी खुणा त्यांच्या दग्याच्या सारखा बुजवीत गेलो

तू जिण्या होतास माझा, मी तुझा नव्हतो कुणीही
तू मला उसवीत गेला, मी तुला सजवीत गेलो

## गाणे

जमेल तेव्हा जमेल त्याने जमेत घ्यावे गाणे
जगणाऱ्याने जगता जगता मजेत गावे गाणे

आयुष्याच्या वेलीवरती भाव-फुले बहरावी
ती वेचाया अलगद खाली नक्षत्रे उतरावी
नक्षत्रांच्या श्वासातुनही पेरित जावे गाणे
जगणाऱ्याने जगता जगता मजेत गावे गाणे

पाउस, पाणी, प्रकाश, वारा, पक्षी, सागर, सरिता
परमेशाच्या प्राणामधल्या जिवंत साऱ्या कविता
आनंदाने मिळेल त्याचे कवेत घ्यावे गाणे
जगणाऱ्याने जगता जगता मजेत गावे गाणे

जगण्याचे बळ उदंड देते गाणे प्रत्येकाला
इथे न कोणी अमर अखेरी जाणे प्रत्येकाला
जाता जाता दुनियेसाठी उधळुन जावे गाणे
जगणाऱ्याने जगता जगता मजेत गावे गाणे

## भान

मलाही झोप लागेना, तुलाही झोप लागेना
शहाण्या संयमाचाही बहाणा नीट वागेना

कसा हातात मी घेऊ गुलाबी हात चंद्राचा ?
गराडा धीट मेघांचा जराही दूर पांगेना

तुझ्या तारुण्य-लाटांचा असा आवेग होता की —
गडे, माझ्या किनाऱ्याचा मलाही ठाव लागेना

हवेला माहिती होती सुगंधाच्या घराण्याची
कळाले सोनचाफ्याला जुई का नाव सांगेना

दिले एकेक ताऱ्याने तुला आभाळ रंगाचे
तुझी का लाजरी मेंदी हवा तो रंग मागेना ?

पहाटे काळजीचाही जरासा लागला डोळा
मिठीने जाणले तेव्हा तुझे का भान जागेना ?

## फिर्याद

हसवून चेहऱ्याला फसवून लोक गेले
आयुष्य टाचलेले उसवून लोक गेले

रक्ताळल्या व्यथांची बघुनी वरात माझी
चाणाक्ष पावलांना वळवून लोक गेले

शतवार हुंदक्यांनी बोलावले सुखाला
परि हाय ! कान त्याचे फुंकून लोक गेले

फिर्याद नोंदताना वदले हताश अश्रू
प्रत्येक ओंजळीला फितवून लोक गेले

माझा जिवन्त मृत्यू मजला फितूर झाला
त्यालाहि लाच मोठी देऊन लोक गेले

जळलो असा स्मशानी मज दुःख हे परंतू
राखेस रोज माझ्या तुडवून लोक गेले

## हृदय मागे थांबले

ज्या ठिकाणी सूर माझे अक्षरांना बिलगले
तिथुन मी गेलो पुढे, पण हृदय मागे थांबले

गंध उधळित धुंद वारा भोवताली वाजला
मारुनी वाळूत रेघा चंद्र तेव्हा लाजला
श्वासही अपुल्या फुलांचे क्षण जिथे खोळंबले
तिथुन मी गेलो पुढे, पण हृदय मागे थांबले

हासले पद्रात जेव्हा फूल माझे लाजरे
नाचली हिरव्या क्षणांची अंतरी फुलपाखरे
अन् सुखाचे दान करण्या नभ जिथे ओथंबले
तिथुन मी गेलो पुढे, पण हृदय मागे थांबले

चंद्रही तंद्रीत होता पिंपळाच्या पलिकडे
मी तुला हलकेच म्हटले, "ये जराशी अलिकडे"
तू 'नको' बोलूनही मज सर्व जेथे अर्पिले
तिथुन मी गेलो पुढे, पण हृदय मागे थांबले

## नवकलिका

क्षितिजामागे गतवर्षाची रात्र जशी कलली
कालतरूवर नववर्षाची नवकलिका फुलली

धवल दवातुन मृदुल फुलातुन नवी उषा आली
नव-आशांचे रंग रंगले पूर्वेच्या गाली
दिशादिशांच्या हिंदोळ्यावर वसुंधरा झुलली
कालतरूवर नववर्षाची नवकलिका फुलली

मनामनातुन आकांक्षांचे दीपक झगमगले
नभात मन, की मनात नभ, हे कुणास ना कळले
नयनामाजी मधाळ स्वप्ने हळूच कुजबुजली
कालतरूवर नववर्षाची नवकलिका फुलली

हृदयाच्या काठावर फुटल्या प्रतिभेच्या लाटा
शब्दांच्या अंतरात सजल्या आशयघन वाटा
अनुभूतीच्या श्वासावरती कविता ही नटली
कालतरूवर नववर्षाची नवकलिका फुलली

## निशाणी

हा तुला हिरव्या ऋतूंचा सांगतो संदेश राणी
वेच मोराच्या पिसांनी तू फुलांची गंध-गाणी

तू हळू झंकारताना वाजला पानात वारा
पलिकडे गोऱ्या जुईला कोवळा आला शहारा
बिलगुनी प्राणास तुझिया सांगताहे रातराणी
वेच मोराच्या पिसांनी तू फुलांची गंध-गाणी

आठवांच्या श्रावणातच आपुले आकाश न्हाले
सात जन्मांचे अचानक जीवनी मधुमास आले
ना विरावी याच जन्मी लाडके अपुली कहाणी
वेच मोराच्या पिसांनी तू फुलांची गंध-गाणी

ही मधाची आग सारी चांदण्यांची रात्र प्याली
अन् पुन्हा प्राणात झाल्या रेशमाच्या हालचाली
राहु दे स्मरणात माझ्या पुसटलेली मधुनिशाणी
वेच मोराच्या पिसांनी तू फुलांची गंध-गाणी

बंड

एकेक प्रेत तेथे ओकीत बंड आहे
इथल्या जित्या मढ्यांचे काळीज थंड आहे

जिंकून सूर्य त्यांनी त्यांच्या घरात नेला
आता इथे तमाचे जगणे उदंड आहे

क्रांतीमधून त्यांच्या, आभाळ पेटलेले
शब्दास मात्र इथल्या उच्चार-दंड आहे

तक्रार सार्थ होती रक्तातल्या विजांची
इथल्या पराभवाला फाजील गंड आहे

त्यांच्या रित्या उराला होती क्षुधा जयाची
उष्ट्या कणास येथे गर्दी प्रचंड आहे

त्यांच्या पराक्रमाने मृत्यूस ठार केले
प्रत्येक श्वास इथला मुर्दाड षंढ आहे

## धूर

तुझ्या नाजूक स्वप्नांचा गुलाबी नूर मी होतो
तुझ्या दैवास तेव्हाही कुठे मंजूर मी होतो ?

तुला होती कुठे आशा फुलांच्या धुंद गाण्याची ?
तुझ्या एकेक श्वासाचा सुगंधी सूर मी होतो

सुखाची नाटकी भाषा मला माहीत का नाही ?
तुझ्या बेचैन आत्म्याचे खरे काहूर मी होतो

कसा हा कोरडा आला नवा पाऊस शब्दांचा ?
दयेचा थेंब झेलाया किती आतूर मी होतो

पहा डोळ्यांत या माझ्या तुझी तू आसवे सारी
तुझ्या आषाढ-मेघांचा अभागी पूर मी होतो

अशा निःस्वार्थ प्रीतीला जगाने जाळले तेव्हा
मला तू शोधले कोठे ? चितेचा धूर मी होतो

## नोंदी

डोळ्यांत आज माझ्या तरळू नकोस तू
ओठांतुनी अवेळी उसळू नकोस तू

अजुनी जरा किनाऱ्या सरकून ये पुढे
आताच लाट माझी कवळू नकोस तू

लपवून ठेव सारी दुःखे नवीजुनी
संसार आसवांचा उधळू नकोस तू

गेला तुझा कधीचा मधुमास हा कोरडा
गाणे अता फुलांचे बरळू नकोस तू

तू धोरणी उन्हाचा समजून बेत घे
वाळूत सावल्यांना मिसळू नकोस तू

हे वेदने, जगाच्या नोंदी तुझ्या किती ?
हे चार शब्द माझे वगळू नकोस तू

## कैफियत

झिडकारला हवेने का साथसंग माझा ?
हा जन्म एवढा का आहे भणंग माझा ?

काट्यात काढली मी सारी हयात माझी
हे फूल माळण्याचा पहिला प्रसंग माझा

तू लाव तारकांच्या हातास आज मेंदी
कण्हतो धुळीत येथे जखमी विहंग माझा

घे ना रुमाल थोडा ओठावरून खाली
घे ओळखून आता तू रागरंग माझा

खेळू जरा नभाशी इतकेच मी म्हणालो
कळले मला न केव्हा कटला पतंग माझा

जरि कुंचलाच माझा नाकारला जगाने
मागेल आवडीने आभाळ रंग माझा

रक्तात रोज माझ्या गुंजारते मराठी
केला न मी मराठी ताठा सवंग माझा

## टवाळी

एकाही दरवाजाला दुःखाची जाळी नाही
मी चुकून येथे आलो ही माझी आळी नाही

" हा ऋतू लफंगा आहे " बागेने म्हटले तेव्हा
ओरडा फुलांनी केला विश्वासू माळी नाही

का मलाच दोषी म्हणता न्यायी लोकांनो सांगा ?
एका हाताने केव्हा वाजणार टाळी नाही

सन्मान इथ का होतो पापाचा मला कळेना
का न्याय तुझा रे देवा पुण्याच्या भाळी नाही ?

कोणत्या सांग हृदयाने झेलला न लोळ विजेचा ?
कोणत्या सांग जगण्याची झाली लाथाळी नाही ?

त्याच्याही डोळ्यांमधुनी माझीच आसवे आली
दोघांना कळले अमुची वेदना निराळी नाही

गावात व्यथेच्या सारे आयुष्य काढले ज्याने
तो कधी कुण्या अश्रूंची करणार टवाळी नाही

## मला-तुला

मला-तुला नको झुला
हवा खुला वारा
त्यात झुलू गात फुलू
लोक भुलू सारा

जोडु खुणा छेडु पुन्हा
हृद्-वीणा-तारा
उजळु स्मृती कवळु प्रिती
उधळु पूर्ती-धारा

प्रणयातुन करु अर्पण
शुचि बंधन-हारा
चल इथुनी बघेल कुणि
ढगातुनी तारा

## अंधारल्या रात्री

अंधारल्या रात्री द्युती तूच नेत्री
म्हणुनी सर्वत्री पाही पाही

पापी देह माझा होता त्यास इजा
रडशी तू राजा धायी धायी

अशी तुझी प्रीत उपमानातीत
दुसरी खचीत नाही नाही

तूच धरापती सत्य तुझी उक्ती
आली अनुभूती ठायी ठायी

म्हणूनीच राया सेवेत जगाया
जीवन हे पाया वाही वाही

## दान

सुखदुःखाची फुले मिळाली शब्दांच्या रानात
हळूहळू मी हेच सांगतो कवितेच्या कानात

झुळझुळणाऱ्या निळ्या जलातुन
दरवळणाऱ्या सुम-गंधातुन
खुणावसी तू कमलदलातुन दहिवरल्या पानात
हळूहळू मी हेच सांगतो कवितेच्या कानात

ये सत्याच्या ध्यासामधुनी
अनुभूतीच्या श्वासामधुनी
ये झंकारत ताऱ्यांमधुनी हृदयाच्या गगनात
हळूहळू मी हेच सांगतो कवितेच्या कानात

कसे तुझ्याशी नाते जुळले ?
शब्दांनाही नाही कळले
घनाशयाचे जन्म उजळले प्रतिभेच्या दानात
हळूहळू मी हेच सांगतो कवितेच्या कानात

## जोगिया

त्या तरुण मैफलीतून
पहाटे पहाटे उठून जाणारा जोगिया
तुझ्या डोळ्यांतून निथळला
सुरांनी शब्द बदलला
शब्दांनी सूर बदलला

## मित्रास

मित्रा........
तू गरीब आहेस
पण लाचार नाहीस
हे मी जाणतो
पण माझं थोडं ऐक
हे चार किरण तू घेऊन जा
निदान या चार किरणांसाठी तरी
उद्या तुझ्या झोपडीत सूर्य नक्की येईल

## जाळ

तोडली माझी तुझी मी नाळ आता
जीवना तूही तुला सांभाळ आता

उंच लाटांना किती भ्यालीस तेव्हा ?
शांत माझ्या अंतरी फेसाळ आता

कोडगे झाले जुने आरोप सारे
घे नवा माझ्यावरी तू आळ आता

सांग तू माझ्या दिशा नेल्यास कोठे ?
मी कसे तोलू तुझे आभाळ आता ?

का गडे आलीस तू डोळे पुसाया ?
चालली माझीच टाळाटाळ आता

सोसण्यासंगेच मी संपून गेलो
राहिला माझ्या चितेचा जाळ आता

## गस्त

कोरड्या या सांत्वनावर सोसण्याची भिस्त नाही
भोगतो जे दुःख मी, ते एवढेही स्वस्त नाही

देश काळोखात माझा हिंडतो आहे कधीचा
ऐकतो आम्ही तरीही सूर्य हा बंदिस्त नाही

क्रूस हा ताजे कुणाचे रक्त येथे मागताहे ?
ही सुखी गर्दी बघ्यांची यात कोणी खिस्त नाही

कोणत्या हृदयात नाही वेदनेची रागदारी ?
कोणता माणूस येथे आतुनी उद्ध्वस्त नाही ?

हे जरी आयुष्य माझे सांगते गोष्टी सुखाच्या
मी असा घायाळ, माझा प्राणही विश्वस्त नाही

अलिकडे सारे नको ते चेहरे येती समोरी
उलिकडे डोळ्यांत माझ्या आसवांची गस्त नाही

## आषाढ

होकार मी फुलांचे नाकारले कशाला
कारुयास जीवघेण्या हाकारले कशाला ?

केला न मी घरोबा येथे ऋतू फुलांशी
गात्री सुगंध माझ्या झंकारले कशाला ?

मागेच जीवनाला उधळून धूळ गेली
आकाश हे नव्याने हुंकारले कशाला ?

केली जरी स्मिताची तेव्हा न मी चहाडी
आता मला सुखाने झिडकारले कशाला ?

सारे लबाड होते आषाढ आसवांचे
डोळ्यास पापण्यांनी शाकारले कशाला ?

## काळजी

अशासाठीच दोघांच्या जिवाला काळजी होती ?
कशासाठी तुझीमाझी जगाला काळजी होती ?

नको तेव्हा नको त्यांनी नको त्या काढल्या शंका
खरी शालीन चंद्राची ढगाला काळजी होती

बरे झाले लतांनीही हवेची राखली मर्जी
वसंताच्या स्वभावाची फुलाला काळजी होती ?

सुखाच्या गोड ठेचांना सुखाने बांधल्या पट्ट्या
व्यथेच्या खोल घावाची कुणाला काळजी होती ?

जुन्या ओसाड भिंतींचे म्हणाले धीट पापुद्रे
तुझ्या खोट्या प्रतिष्ठेची घराला काळजी होती

अरे होईल का येथे उद्या हा देव साऱ्यांचा ?
खऱ्याचा घोट घेताना विषाला काळजी होती

## ओसरी

काळीज लेखणीचे कोणी चिरू नये
नाराज अक्षरांचे गाणे करू नये

वाढू नये सुरांच्या लाडात एवढे
न्यायालयी सभेच्या दोषी ठरू नये

"हा चंद्र लाचखाऊ", काळोख सांगतो
या शुभ्र पौर्णिमेला तू घाबरू नये

रक्ताळल्या व्यथेला सांभाळ तू असे
केव्हाच आसवांचे डोळे भरू नये

आताच यौवनाच्या लाटेत घे उडी
येईल पूर तेव्हा तू ओसरू नये

घ्यावा मिठीत सारा पाऊस एकदा
ओथंबल्या घनांशी आढी धरू नये

आहे बरी उन्हाची शालीन ओसरी
बेमान सावलीच्या दारी मरू नये

## वेळ

नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची
अता कळ्यांना झाली घाई फुलावयाची

किती अचानक तू येण्याचा निरोप आला
वेलींच्या प्राणात फुलांचा प्रकाश झाला
पानांनाही ओढ लागली झुलावयाची
नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची

दिशादिशांतुन लहरत आले सुगंध-वारे
गंधाला सानंद म्हणाले मिलींद सारे
" नामी संधी मरंद हलके टिपावयाची "
नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची

फुलण्याच्या उत्सवात रमल्या हिरव्या रेषा
झाडांना सावळ्या भुईची कळली भाषा
खरेच आली वेळ कळ्यांना जपावयाची
नको वसंता उगीच चर्चा तुझ्या वयाची

## पसार व्हायचे

तो नवेपणात हे असे प्रकार व्हायचे
ती नको नको म्हणूनही रुकार द्यायचे

ती कधी उगीच हासणे
 कधी उगीच लाजणे
तो कधी फुलात चांदणे अपार प्यायचे
ती नको नको म्हणूनही रुकार द्यायचे

तो अजून दूर तू अती
 अजून का मनी भिती ?
 अजूनही तुझे किती करार व्हायचे ?
ती नको नको म्हणूनही रुकार द्यायचे

तो हळूच शब्द देउनी
ती हळूच चंद्र घेउनी
दोघे हळूच तारकांतुनी पसार व्हायचे
ती नको नको म्हणूनही रुकार द्यायचे

## थेंबच दे नुसता

तुला अर्पितो जीवन-गाथा दे आशिष आता
प्रभो मी टेकविला माथा

तू उद्धारक त्रिभुवन-मालक
प्रणत जनांचा तूची चालक
सांग कधी रे अवखळ बालक टाकुन दे माता ?

जग-मोहाला संतत झुकलो
तव प्रेमाला म्हणुनी मुकलो
घे पदरी तू जरि मी चुकलो हो आश्रयदाता

तू नीतीचा सतेज भास्कर
तू प्रीतीचा अथांग सागर
मी नच मागे भरली घागर थेंबच दे नुसता

## फुलून जायचे

तुझेच गीत आज मी झुलून गायचे
ऋतूत मी तुझ्या प्रिया फुलून जायचे

जिथे तुला मला नवा वसंत भेटला
सुखात पारिजातही जिथे लपेटला
तिथे सुगंध आजही टिपून घ्यायचे
ऋतूत मी तुझ्या प्रिया फुलून जायचे

कधी हसायचे प्रिया कधी रुसायचे
कधी फुलास नाव मी तुझे पुसायचे
कधी तुझ्यात तुजसवे विरून जायचे
ऋतूत मी तुझ्या प्रिया फुलून जायचे

हसून कालचेच मी नकार द्यायचे
तरी हळूच तू मला कवेत घ्यायचे
तुझ्या मिठीत विश्व मी भुलून जायचे
ऋतूत मी तुझ्या प्रिया फुलून जायचे

## रेघ

मी तुला मानलं तू मला मानलं
लोकांनाही जाणलं हे सुटणार नाही

कळून आली भाषा जुळून आली दिशा
फुललेली आशा वठणार नाही

धीर देतो तुला ऐक माझ्या फुला
स्वप्नांचा झुला तुटणार नाही

फुलांची लाट वसंताचा काठ
धुक्याला वाट फुटणार नाही

सांभाळ तोल प्रीतीचे मोल
वादळाचा लोळ उठणार नाही

चर्चेचे मेघ दाखवतील वेग
कपाळाची रेघ पुसणार नाही

## भेद

जरी आक्रांत अश्रूंचा व्यथेच्या अंतरी झाला
इथे कोणी न दुःखाचा कधी वाटेकरी झाला

अता फिर्याद ही माझी कळेना नोंदवू कोठे ?
इथे अन्याय न्यायाचा खरा मारेकरी झाला

कशासाठी करू माझ्या खुनाचा बोलबाला मी ?
गळा कापून गेलेला अता खांदेकरी झाला

खऱ्याची कोणती व्याख्या कळेना सभ्य लोकांना ?
मघाशी चोर जो होता अता सावापरी झाला

नका हो एकमेकांच्या खुषीने थोपटू पाठी
कुणाचा शेर येथे का जगाची वैखरी झाला ?

नभाला छेदुनी गेली भुकेची आर्त किंकाळी
पुन्हा सौदाच अन्नाचा शिळ्या घासावरी झाला

कशाला जात सूर्याला पुसाया माणसे गेली ?
कधी का भेद जातीचा प्रकाशाच्या घरी झाला ?

## तुझ्यासाठी

मी जिणे जाळले तुझ्यासाठी
मी मला टाळले तुझ्यासाठी

चंद्र रागावला जरी होता
वायदे पाळले तुझ्यासाठी

बोलते रेशमी मिठी माझी
श्वास गंधाळले तुझ्यासाठी

दे मला एकदा तुझे डोळे
स्वप्न सांभाळले तुझ्यासाठी

नाव ओलीतले कुठे गेले ?
पान मी चाळले तुझ्यासाठी

## झेंडा

हे दुःख लेखणीचे अद्याप जात नाही
माणूस माणसाची मानीत जात नाही

पाडू नका कुणीही जातीत पोटजाती
जातीत कोणत्याही ऐसा प्रघात नाही

आम्ही सहा रिपूंची बिनधोक लाच घेतो
हा काय ईश्वराचा विश्वासघात नाही ?

एकेक चेहऱ्याचा धोका इथे असा की–
बाहेर वाटतो तो माणूस आत नाही

जातीयवाद नाही माहीत पावसाला
जातीनुसार वारा येथे वहात नाही

ज्याने उभारला हा झेंडा समानतेचा
हातात आज माझ्या त्याचाच हात नाही

## रंग

हवाही आपली होती ऋतूही आपला होता
कळेना चंद्र हा कोणी फुलांनी झाकला होता

मला आकाश देताना ढगांनी काढली शंका
तुला तेव्हा कसा माझा भरोसा वाटला होता ?

तुझ्या ओठी वसंताचे कधीही नाव का येते ?
कळ्यांनी कोणत्या वेळी उखणा घातला होता ?

अशासाठी दिव्यानेही स्वतःचे झाकले डोळे
सुगंधी रातराणीचा गुलाबी मामला होता

जरी न्हाऊन तू साऱ्या खुणा केल्यास नाहीशा
तरीही रंग मेंदीचा नभाला लागला होता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६१२
काव्य २६९६४
२३।७।९०

## चांदरात

तुझीच लाट शोधते अजून सागरात मी
नकोस ओसरू असा अजूनही भरात मी

अता कुठे हवा तसा सुगंध ये मला तुला
विचार तूच एकदा मनातल्या जुईफुला
कुणासवे सुखावते वसंत मोहरात मी ?
नकोस ओसरू असा अजूनही भरात मी

खुणावतो तुलाच का मधाळ चंद्र सारखा ?
विचारतात प्रश्न हा मला खट्याळ तारका
प्रकाशते पुन्हा पुन्हा मनातल्या नभात मी
नकोस ओसरू असा अजूनही भरात मी

दिव्याशिवाय ज्योत ही कधीतरी जळेल का ?
अबोल साजणा तुला अतातरी कळेल का ?
धरून ठेवली इथे कशास चांदरात मी ?
नकोस ओसरू असा अजूनही भरात मी

## तृषा

जय जय जगदीशा
तुझ्या कृपेच्या वर्षावाने भिजव दिशा-विदिशा

तुझीच आहे सृष्टी सारी
तुझ्याच अवघ्या सागरलहरी
तुझा दिवस अन् झगमगणारी तुझीच पुनवनिशा

तुझीच प्रतिमा चराचरातुन
सजल घनातुन, मृदुल फुलातुन
पूर्ण करिल रे कोण तुझ्याविण लतिकांच्या मनिषा ?

अगाध महिमा तुझा कळावा
अध्यात्माचा सूर जुळावा
दिनी, अनुदिनी वाढो देवा भक्तीचीच तृषा

## हळूहळू

फुलातल्या फुलास मी विचारले हळूहळू
फुलात फूल कोणते शहारले हळूहळू ?

नभात चंद्रमा नसे
घरात यामिनी बसे
उन्हात चांदणे कसे फुलारले हळूहळू ?

तुझे सुगंध हे असे
जुईत मोगरे जसे
तुला टिपून आरसे थरारले हळूहळू

दवात रात पेंगते
पहाट न्हात रंगते
मला तुला कुणी तिथे पुकारले हळूहळू ?

बघून चित्र हे असे
जगास लागले पिसे
मनात मीहि ते तसे चितारले हळूहळू

## काफिला

चुकला होता प्रवास माझ्या मनोगतांचा
उगीच मी पाठलाग केला तुझ्या स्मितांचा

अजून स्मरतो मधाळलेली तुझी कहाणी
अजून गातो तुझ्या कळ्यांची सुगंध-गाणी
अजून रात्री वसंत फुलतो तुझ्या फुलांचा
उगीच मी पाठलाग केला तुझ्या स्मितांचा

तुझ्या प्रकाशी नक्षत्रांचे शब्द मिळाले
घनाशयाच्या आभाळाचे गूढ कळाले
आज असा का चंद्र बदलला परस्परांचा ?
उगीच मी पाठलाग केला तुझ्या स्मितांचा

आयुष्याच्या उजाड रानी हिरवळ कुठली ?
संदेहाच्या चक्र्यामधुनी प्रीत निसटली
तिच्याचमागे निघे काफिला मनोरथांचा
उगीच मी पाठलाग केला तुझ्या स्मितांचा

## मेंदी

लागली आज पुन्हा हात धराया मेंदी
मागते तोच जुना रंग जगाया मेंदी

वाटला आज कसा सांग भरोसा माझा ?
काय आलीस नवा घाव कराया मेंदी ?

सोड ना हात रहा दूर उभी तू थोडी
लागले आत पहा लोक जळाया मेंदी

फूल जे रोज तुझे नाव पहाटे घेते
त्या फुलालाच हवे भान फुलाया मेंदी

वाच डोळ्यांत कथा एक निनावी माझी
थांबला जन्म तुझे नाव लिहाया मेंदी

## शिताफी

कोण जाणे मी कशाला एवढा हुरळून गेलो ?
एवढे स्मरते मला की मी तुझ्या जवळून गेलो

ते फुलांचे श्वास होते की सुखाचे भास होते ?
आठवेना मी कुणाला अंतरी कवळून गेलो

सूर माझे गुणगुणाया ती हवा नाराज होती
का ऋतूंचे गंधगाणे मी तरी बरळून गेलो ?

मी जगाच्या वेदनांचे वाचले पाढे परंतू
हाय मी माझाच पाढा नेमका वगळून गेलो

तू जरी केलास तेव्हा वायदा एका क्षणाचा
हे उभे आयुष्य माझे मी तुला उधळून गेलो

ती शिताफी पापण्यांची की चलाखी आसवांची
मी तुझ्या डोळ्यांमधूनी कोरडा निथळून गेलो

## निरोप

कळे न का आरोप घनाला उजाड अवघ्या रानाचा
वाऱ्याचे ऐकतो नको ते पाउस हलक्या कानाचा

उमलायाची करते घाई कुणी किशोरी खुळी जुई
आभाळाला कौल मागते व्याकुळलेली खिन्न भुई
म्हणे " कसा वर्षाव होइना अंगांगावर मोत्यांचा " ?
वाऱ्याचे ऐकतो नको ते पाउस हलक्या कानाचा

फुलाफुलावर अलगद यावे थेंब घनाचे नवे नवे
इवल्याशा थेंबात नभाचे बिंब दिसावे हवे हवे
यासाठी वेलींच्या दारी वाद चालला पानांचा
वाऱ्याचे ऐकतो नको ते पाउस हलक्या कानाचा

पुन्हा पुन्हा अंबरात होते सजलघनांची पांगापांग
सृष्टीच्या डोळ्यांतुन उडते हिरमुसल्या मोरांची रांग
त्या मोरांच्या रांगेलाही निरोप कळला गगनाचा
वाऱ्याचे ऐकतो नको ते पाउस हलक्या कानाचा

## ईश्वरास

इथेतिथे मला दिसे तुझा प्रकाश ईश्वरा
तुझाच ध्यास लागला अता मनास ईश्वरा

तुझीच ही वसुंधरा, तुझेच सूर्यचंद्रही
तुझीच तारकाफुले नभांगणास ईश्वरा

जगास रोज ही उषा तुझाच रंग वाटते
दिलास गंध तूच ना कळ्याफुलास ईश्वरा

अथांग तू, तुडुंब तू, तुझी महानता खरी
तुझ्याशिवाय जन्म हा न जन्म खास ईश्वरा

## गीत

कवितेत भराया रंग नवे
मज तुझे चिरंतन प्रेम हवे

दे प्रतिभेला आकार नवा
दे शब्दांना झंकार नवा
दे कवितेला तारुण्य नवे । मज तुझे चिरंतन प्रेम हवे

तू माझी स्फूर्ती, प्रीतीही
सांगाया वाटे भीतीही
तरि बोलुन गेले मन हळवे । मज तुझे चिरंतन प्रेम हवे

अर्थाचे घेऊन अंबर तू
ये शब्द शब्द हा मंतर तू
ताऱ्यांचे गात्री लाव दिवे । मज तुझे चिरंतन प्रेम हवे

तू लोभसवाणे अक्षररूप
लयतालस्वरांचे मूर्त स्वरूप
तुजवाचुन गीताहि गीत नव्हे । मज तुझे चिरंतन प्रेम हवे

## अट

माणसांना घरं हवी असतात
घरांना माणसं हवी असतात
घरांची फक्त एकच अट असते
त्यांचं घरपण टिकण्यासाठी
माणसाचं माणुसपण जिवंत असावं

## ये नववर्षा ये

मनामनातिल जातियतेचा वणवा विझवित ये
ये नववर्षा माणुसकीचे मंदिर सजवित ये

कळे न मानव मानवतेचा वैरी का झाला ?
आभाळाला भिडल्या इथल्या द्वेषाच्या ज्वाला
त्या ज्वालांना प्रेमाश्रूंनी अविरत भिजवित ये
ये नववर्षा माणुसकीचे मंदिर सजवित ये

जिकडे तिकडे खिन्न पसरली दुःखाची छाया
स्वार्थासाठी लळा, जिव्हाळा, वरवरची माया
परस्परातुन आपुलकीचे नाते रुजवित ये
ये नववर्षा माणुसकीचे मंदिर सजवित ये

घराघरातुन नकोत आता भेदाच्या भिंती
एकेकाने जाणुन घ्यावी सत्याची महती
समानतेचा दीप मनातुन सदैव उजळित ये
ये नववर्षा माणुसकीचे मंदिर सजवित ये

## नवस

अरे पावसा राजसा तुला शपथ घालते
तुझ्या अमृताचे ओझे माझ्या उदरी हालते

माझ्या कुशीत डोलतो तुझा भाग्यवान वंश
रोमारोमात भिनला तुझा राजवर्खी अंश

नाही नाही ते चिंतून उरी होते धडधड
डोळे मिटून पहाते आयुष्याची पडझड

राया कधी रे येशील ? का तू येणारच नाही ?
सांगे चहाटळ वारा खोटेनाटे काहीबाही

तुझ्यासाठी आभाळाला लाख नवस करीन
लाल सौभाग्याचे कुंकू हिर्व्या भांगात भरीन

## आबाद

केला न का व्यथेचा अनुवाद अक्षरांनी ?
मागू नये खुलासा बरबाद अक्षरांनी

प्रत्येक घोषणेच्या ओठात चीड होती
नाही दिला कधीही प्रतिसाद अक्षरांनी

बदनाम सावलीचा झाडास दंड झाला
का मानला उन्हाचा अपवाद अक्षरांनी ?

हा सोहळा फुलांचा की सापळा हवेचा ?
घालू नये ऋतूंशी हा वाद अक्षरांनी

झाला शहीद माझ्या गावामधील दंगा
केला खरेपणाशी संवाद अक्षरांनी

तू सांग जात आधी तेव्हाच प्रेत उचलू
केली कलेवराला फिर्याद अक्षरांनी

होतो जरी असा हा कंगाल, फाटका मी
केले मला अखेरी आबाद अक्षरांनी

REFBK-0026164

REFBK-0026164

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ....काव्य
ग्रं. क्र. २६१२

# आमची आगामी प्रकाशने

**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**
आद्य शंकराचार्य (चरित्र)

**डॉ. य. दि. फडके**
आंबेडकरी चळवळ

**फिरोझ रानडे**
काबुलनामा

**सदाशिव आठवले**
सरदार बापू गोखले

**रंगा मराठे**
वणवा

**लता राजे**
नेपोलियन
परिक्रमा भाग. २

**शांता हुबळीकर**
कशाला उद्याची बात

**माधव गडकरी**
न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

**रमण रणदिवे**
ऋतु फुलांचा

**उल्का काकतकर**
परिसर शिक्षण

**शांताराम**
संध्याराग

**निर्मल गुरुजी**
महात्मा जोतीराव फुले

**श्रीविद्या प्रकाशन**

श्रीविद्या प्रकाशन

